अहम् आवाम्
वर्ष दहावे | अंक १ | जून २०२२ | पृष्ठे ५२

# वयम्

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

मूल्य ₹ ९०/-





कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
अहम् आवाम्
वयम्
ऐकता ऐकता
वाचू या!
गोष्टी
गप्पाटप्पा
कल्पक
मनोरंजन
लवकरच येत आहे..
मुलांचं आवडतं
वयम् मासिक आता श्रवणीय! -
वयम् ॲप
GET IT ON
Google Play
Download on the
App Store
www.wayam.in | 7045453343

RNI NO.MAHMUL/2013/53138

अहम् आवाम्

कल्पक, चौकस किशोरांचे मासिक

वयम्

वर्ष १० | अंक १ | जून २०२२

ज्येष्ठ/आषाढ शके १९४४

**प्रकाशक**
श्रीकांत बापट

**सल्लागार**
डॉ. अनिल काकोडकर
कुमार केतकर
डॉ. आनंद नाडकर्णी
डॉ. उदय निरगुडकर
अच्युत गोडबोले
राजीव तांबे
श्रीकांत वाड

**मुख्य संपादक**
शुभदा चौकर
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

**मुखपृष्ठ**
**भाग्यश्री पटवर्धन**

**सुलेखन**
अच्युत पालव

**अंकातील चित्रे**
गिरीश सहस्रबुद्धे, जुईली माहीमकर

**वरिष्ठ उपसंपादक**
क्रांती गोडबोले-पाटील

**मांडणी-सजावट**
क्रांती गोडबोले-पाटील

**मुद्रितशोधन**
शिवानी ओक

**वितरण व्यवस्था**
राजेंद्र गोसावी

'वयम् हे मासिक मालक, प्रकाशक श्रीकांत बापट यांनी मेसर्स रेड एलिफंट, ३१५/ए १, शाह ॲण्ड नाहर इंड. इस्टेट, ३रा मजला, एस. जे. मार्ग, लोअर परेल (प.) मुंबई- ४०००१३, येथे छापून, २०१, नंद चेंबर्स, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२ येथे प्रसिद्ध केले. या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधीन.

**संपादकीय विभाग :**
'वयम् न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शाी मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
इमेल : info@wayam.in

www.wayam.in

# अंतरंग

**संपादकीय** : शुभदा चौकर- ४
**फिरुनी नवी जन्मेन मी....** : कांचन जोशी- ७
**बालपणावर आक्रमण** : सुचिता देशपांडे- ८
**कच्चे पक्के** : राजीव तांबे- १२
**कल्पककला** : स्वरूपा वक्नाली- १३
**बहारदार शिबिराची मेजवानी**- १४
**मोबाइलचे युग** : गायत्री शेरीकर- १७
**पक्षी आणि झाडं- गहिरं नातं!** : भाग्यश्री पटवर्धन - १८
**क्लासिक** : धनवंती हर्डीकर- २०
**Hide & Seek :** Juilee Mahimkar- २६
**तयारी शुक्रावरच्या स्वारीची...** : श्रीराम शिधये - २८
**अंकस्वस्तिक** : सुरेखा काणे- ३१
**Patience is virtue :** Prachi Mokashi- ३२
**दोन चाकांचा रंजक प्रवास** : सोनाली कोलारकर-सोनार- ३६
**गळा नाही, तरी आवाज आगळा!** : मकरंद जोशी- ४०
**चपखल** : प्रतिभा गोपुजकर- ४३
**माझे किशोरवय** : मंदार भारदे- ४४
**रिमझिम** : अपर्णा- ४७
**शेपटीवाले रुग्ण** : डॉ. मंजिरी बेलसरे- ४८
**मिनू** : अदिती पाध्ये-देसाई- ४९

## मुखपृष्ठाविषयी-

**चिमणी (House Sparrow) आणि बाभूळ (ॲकेशिया निलोटिका)- बाभळीच्या झाडावर सकाळ-संध्याकाळ चिमण्यांची जणू काही शाळाच भरते. नुसता कलकलाट! बाभळीच्या झाडाचा उपयोग पक्षी घरटे करायला हमखास करतात. बाभळीला मोठे काटे असल्याने शिकारी पक्षी आणि प्राण्यांपासनं या छोट्या पक्ष्यांचं रक्षण होतं. सुगरण पक्षी तर हमखास बाभळीवर आपलं झुलतं घरटं बांधतो. परदेशी झाडांऐवजी बाभळीसारख्या अस्सल देशी झाडांची लागवड रस्त्याच्या बाजूला करायला हवी.**

**बहुरंगी बहर प्रश्नावली पुढील अंकात!**

**कागद, छपाई यांसह सर्व खर्च वाढल्याने जानेवारी २०२२ पासून 'वयम्' मासिकाचे वार्षिक शुल्क वाढवून कुरियर चार्जेससहित ते रु. ११०० करण्यात आले आहे. सध्याच्या सभासदांना त्यांचे सभासदत्व असेपर्यंत आधीप्रमाणेच अंक मिळत राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

'वयम्' वाचकांनो, दर महिन्याला २० तारखेपर्यंत तुम्हांला अंक पोहोचला नाही तर 'वयम्'च्या दूरध्वनी क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात संपर्क साधावा, ही विनंती. **-संपादकीय आणि वितरण विभाग**

## संपादकीय

# जमला वाचकांचा मेळा

**‘वयम्’ दोस्तांनो,**

उदगीर हे लातूर जिल्ह्यातील महाराष्ट्र-कर्नाटक सीमेच्या जवळचं शहर. गेल्या महिन्यात तिथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झालं. त्याचे अध्यक्ष होते आपले भारत सासणे. ‘वयम्’च्या जुन्या वाचकांनी त्यांची ‘समशेर कुलूपघरे’ ही मालिका आपल्या मासिकात क्रमशः वाचली असेल. ‘आपले’ संमेलनाध्यक्ष आणि या मराठवाडा प्रांतातल्या आपल्या वाचकांचा आग्रह म्हणून माझ्यासह आपली ‘वयम्’ टीम संमेलनाला गेली होती. तिथे पुस्तक प्रदर्शनाचा मोठा मांडव होता. त्यात आपण दोन गाळ्यांचा रुंद स्टॉल घेतला होता. आपला हा स्टॉल म्हणजे मुलांचं मिनी संमेलन झालं जणू!

आपल्या अंकाची काही कव्हरपेज डिझाइन्स, आपल्या नियमित लेखकांचे फोटो यांचे रंगीत व आकर्षक फ्लेक्स लावून आपला स्टॉल छान सजवला होता. आपल्या अंकात आपण विविध शब्दखेळ, चित्रखेळ प्रसिद्ध करत असतो ना, त्याचे मस्त रंगीत प्रिंट्स आपल्या स्टॉलसाठी करून नेले होते. आता लवकरच आपलं ॲप येणार आहे. त्यासाठी तयार असलेले ऑडिओ आपण मुलांना ऐकवत होतो. त्यामुळे खेळण्यासाठी, ऐकण्यासाठी, अंक चाळण्यासाठी मुलांची झुंबड उडत होती. लातूरची काही मुलं ‘वयम्’ची एकदम फॅन आहेत. ती मुलं दोन-अडीच तास प्रवास करून उदगीरला आली आणि आपल्या दालनात मस्त रमली. ती आपल्या मासिकातलं काय काय वाचलं, आवडलं, यावर आमच्याशी मनमुराद गप्पा मारत होती. साहित्यिक गप्पा हा तर संमेलनाचा मुख्य हेतू असतो. या आपल्या वाचक मुलांनी तो आनंद मिळवून दिला.

वाचनाच्या प्रांगणात नव्याने येत असलेल्या मुलांना ‘वयम्’ मासिक ऐकून, पाहून माहीत होतं. त्याबद्दल अधिक जाणून घेण्याची उत्सुकता होती. ती मुलं दालनात ठेवलेल्या आपल्या अंकांची चळत चाळायची. आनंदित व्हायची. पालकांना म्हणायची की, आम्हांलाही दरमहा हे मासिक हवं. काहींचे पालक हा हट्ट चांगला मानून लगेच पुरवायचे. काही पालक मुलांना ओरडायचे, की तू कुठे काय वाचतोस, म्हणून. काही जण मुलांचा हट्ट बिलकूल पुरवायचे नाहीत. मग जेमतेम एखादा जुना अंक घेऊन द्यायचे. पालकांनी एकही अंक घेऊन न दिल्यामुळे रडवेल्या झालेल्या काही मुलांना बघून मग आम्हांलाही वाईट वाटायचं. अशा काही मुलांना मग आम्हीच एखादा अंक भेट देऊन टाकायचो.

या साहित्य संमेलनासाठी आलेले बहुतेकसे सर्व साहित्यिक आपल्या दालनात येऊन बघून, भेटून गेले. साहित्य संमेलनाची परंपरा अशीच पुढे दीर्घकाळ चालू राहण्यासाठी तर तुमच्या वयाच्या मुलांना साहित्याची गोडी लागायला हवी. नाहीतर पुढे, काही वर्षांनी कोण, कोणासाठी करणार हा उपद्व्याप? त्यामुळे मुलांना वाचनाची आवड लावणाऱ्या आपल्या मासिकाचं दालन आहे तरी






‘वयम्’ मासिकाच्या स्टॉलवर खेळांचा आनंद लुटताना बालवाचक वर्ग



‘ज्ञानपीठ’ विजेते दामोदर मावजो



संमेलनाध्यक्ष भारत सासणे




साहित्यिक डॉ. पृथ्वीराज तौर



‘वयम्’ मासिक टीम




कवी दासू वैद्य, लेखक फारूक काझी, प्रभाकर साळेगावकर, ‘वयम्’च्या संपादक शुभदा चौकर आणि आपल्या नियमित वाचक शांभवी बारोळे, राधिका चामले आणि सिया लड्डा (ज्ञानप्रकाश, लातूर)




माजी संमेलनाध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख आणि मुले








कवी एकनाथ आव्हाड, लेखक बालाजी इंगळे आणि आबा महाजन



ज्ञानप्रकाश, लातूर शाळेची मुले आणि सविता नरहरे मॅडम

कसं, तिथे इतक्या झुंडीने मुलं कशी काय येताहेत, हे बघायला सर्व साहित्यिक उत्सुकतेने व प्रेमाने येऊन गेले. लहान मुलांसाठी लिहिणाऱ्या काही स्थानिक साहित्यिकांशी आमच्या मस्त ओळखी, गप्पा झाल्या. आपले लेखक फारूक काझी तिथे आले, तर आपली वाचक मुलं लगेच म्हणाली, "तुमची चुटकी आम्हांला जाम आवडली." आपल्या मासिकात नियमित लिहिणाऱ्या काही साहित्यिकांच्या लेखनाला दाद देऊन त्यांची चौकशी करणारे वाचकही या तीन दिवसांत भेटले. लातूर, नांदेड पट्ट्यातल्या शाळांच्या शिक्षकांनी खास बसने मुलांना इथवर आणलं होतं. संमेलनात बालकुमार साहित्याचा आकर्षक मांडव होता. तिथे स्वतःची कविता सादर करण्याची संधी मिळालेली अनेक मुलं तर 'वयम्' वाचणारीच होती. ती कौतुकाने आपल्या मासिकाच्या दालनात येऊन त्यांची कविता आम्हांला म्हणून दाखवत होती. घरचं कौतुक हवंसं वाटतं ना!

संमेलनाच्या आदल्या दिवशी उदगीरच्या तीन शाळांनी आम्हांला मुलांशी संवाद साधायला बोलावलं होतं. तिथे भेटलेली मुलं तर आई-वडलांच्या मागे लागून 'वयम्'च्या दालनात आली आणि मस्त खेळून, वाचून, ऐकून गेली.

आम्ही एकच करायचं ठरवलं होतं- खास संमेलन पाहायल्या आलेल्या मुलांना साहित्यात रमण्याचा अनुभव आपल्या दालनात द्यायचा. त्यांच्या लक्षात राहिला पाहिजे हा साहित्याचा उत्सव! त्यांनाही वाटलं पाहिजे की वाचनात, लेखनात रमण्यातही मजा असते. म्हणून अशा वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटीज ठेवल्या होत्या 'वयम्'च्या स्टॉलवर.

स्वतः संमेलनाध्यक्ष भारत सासणे, संमेलनाचे प्रमुख पाहुणे 'ज्ञानपीठ' विजेते कोकणी साहित्यिक दामोदर मावजो, कवी दासू वैद्य, एकनाथ आव्हाड, बालाजी मदन इंगळे, अनुवादक पृथ्वीराज तौर किती नावं सांगू... असे अनेक जण आपल्या दालनात येऊन गेले. या सर्वांना इथली वाचक मुलांची गर्दी बघून दिलासा वाटत होता की, आजची मुलंही वाचतात, साहित्यात रमतात!

उदगीरच्या संमेलनात काही जिव्हाळ्याच्या माणसांशी मेळ जमला. हे शहर आम्हांला अनोळखी होतं. तिथे राहण्यासाठी पुरेशी हॉटेलं, लॉज नव्हते. पण काही भल्या माणसांनी आमची सर्व व्यवस्था उत्तम केली. सगरोळी या खेडेगावातील 'संस्कृती संवर्धन मंडळ'च्या शाळेचे प्रमोद देशमुख यांच्या पुढाकाराने आम्हांला व्यंकटराव कुलकर्णी यांनी त्यांच्या बंगल्यातली जागा राहायला दिली. नरसिंग कंदले आणि त्यांचे सहकारी आमचे मित्र बनून आमच्यासाठी धडपडत राहिले. आम्ही संमेलनाच्या आदल्या दिवशी रेल्वेने उदगीरला उतरताच रिक्षा घेऊन आले आणि परतीच्या प्रवासासाठी सोडायलाही आले. त्या चार दिवसांत आम्हांला त्यांची अतोनात मदत झाली. परक्या ठिकाणच्या संमेलनाच्या प्रांगणात संवेदनशील, मदत करणारी माणसं आम्हांला लाभली आणि दोन दिवसांत ते शहरही आम्हांला आपलं वाटू लागलं.

आपलं काम आपल्याला असा आनंद आणि नवी नाती निर्माण करण्याची संधी देतं, म्हणून मला आपल्या कामाबद्दल कायम कृतज्ञता वाटते.

ऐन एप्रिलच्या अखेरीला उदगीरची हवा एकदम गरम आणि कोरडी होती. पण तिथे मनात ओलावा असलेली मुलं-माणसं भेटली आणि एक सुखद अनुभव मिळाला. 'संमेलन' या शब्दाच्या पोटात 'मीलन' म्हणजे 'एकत्र येणं' हा शब्द दडलाय. आमच्यासाठी आणि आपल्या 'वयम्' मासिकाच्या दालनासाठी तर हे उदगीरचं संमेलन त्या अर्थाला साजेसं ठरलं!

**-शुभदा चौकर**
*cshubhada@gmail.com*

# फिरुनी नवी जन्मेन मी...

## समजूतदारपणे वाढणाऱ्या विचारी मुलीची भावुक गोष्ट!

**पावसाचं** थैमान थांबत नव्हतं. कस्तुराचा नवरा कंपनीतच अडकून बसला होता. पाळण्यातला जिवाजी आणि पाचवीत शिकणारी कल्याणी यांना कवटाळून कस्तुरा पहाटेची वाट पाहत होती. एवढ्यात शेजारचा हणमंता, "वहिनी, पोरांना घ्या आणि भराभर बाहेर पडा. कडा कोसळतोय." एवढंच बोलून पुढच्या घरी हीच हाळी द्यायला वेगाने निघून गेला. क्षणभर तिला सुचेना, काय करावं ते! पण धीर एकवटून ती दोन्ही मुलांना घेऊन घराबाहेर पडली. झपाझप मोठ्या रस्त्याकडे चालू लागली. तिला पाठीमागे किंचाळ्या-विव्हळणं ऐकू येऊ लागलं, तसं तिने मागे वळून पाहिलं. विजेच्या लखलखाटात तिची आपली माणसं गाळ-मातीत रुतत होती.

"कल्याणी, वेगाने धावत हणमंताकाकांच्या मागे जा. मागे वळून बघू नकोस. शाळा सोडू नकोस लेकरा!" असं म्हणत तीही धावू लागली. दलदल आणि पाण्यावरून पाय घसरत होते. हातात तान्हं बाळ होतं. शेवटी ती हरली. दलदलीत अडकली. पण कल्याणी मात्र आईची आज्ञा तंतोतंत पाळत पुढे निघाली. ती सुरक्षित होती.

थोड्याच वेळात उजाडलं. गावातल्या पन्नास-साठ लोकांपैकी फक्त दहा-बारा माणसं आणि कंपनीत अडकलेली दोन-तीन माणसं असे एकूण पंधरा जण शिल्लक होते. बाकीचे सारे त्या कोसळलेल्या कड्यामध्ये नाहीसे झाले होते.

कल्याणीचे बाबा तिला भेटले तेव्हा कल्याणीला पोटाशी धरून त्यांनी हंबरडा फोडला. लहानगी कल्याणी बावरून गेली.

दोन-तीन दिवस सुरू असलेल्या मदतकार्यात फारसं काही हाती लागलं नाही.

गावातल्या शाळेतच सर्व लोकांची तात्पुरती सोय केलेली होती. कोण कोणाची समजूत घालणार? आणि कशी घालणार? पाऊस थांबला.

कल्याणी पाय पोटाशी घेऊन बसली होती.



"शाळा सोडू नको" हे आईचे शब्द तिला पुन्हा पुन्हा आठवत होते. समुपदेशक, स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने गाव दोन-तीन महिन्यांत वरकरणी तरी वसलं. कल्याणी पुन्हा शाळेत जाऊ लागली.

जमीन खचल्यामुळे ही दुर्घटना झाली हे भूगोल शिकताना पुढे वर्षभरात कधीतरी तिला समजलं. झाडं लावल्याने अशा दुर्घटना वाचू शकतात, हेही तिला भूगोलातूनच समजलं.

आता कल्याणी गावातल्या सर्वांकडून जांभूळ, आंबा, करवंदाच्या बिया गोळा करते. रोपं तयार करते. पावसाळ्याच्या सुरुवातीला शिक्षक आणि वर्गातील मित्र-मैत्रिणींसोबत ती मोकळ्या जागेत झाडं लावते. ही झाडं जगावीत यासाठी प्रयत्न करते. त्या रुजणाऱ्या, जगणाऱ्या आणि वाढणाऱ्या झाडांबरोबर कल्याणीही पुन्हा रुजतेय, जगतेय आणि वाढतेयसुद्धा!

**-कांचन जोशी**
*kanchanpjoshi76@gmail.com*
*(संस्कृत अभ्यासक)*



**प्रत्येक युद्ध हे मुलांसाठी फारच जाचक असतं. आत्ता, या क्षणी जगभरात अशी लाखो मुले आहेत, जी आपला जीव मुठीत घेऊन जगत आहेत...**

# बालपणावर आक्रमण

**आपण** इथे उन्हाळी सुट्ट्यांत मजा करतोय, पण आत्ता, या क्षणी जगभरात अशी लाखो मुलं आहेत, जी आपला जीव मुठीत घेऊन जगत आहेत. स्वतःच्या घरापासून दुरावलेली, उपासमारीने हैराण झालेली, शाळा बंद झाल्याने हिरमुसलेली...

प्रत्येक युद्ध हे मुलांसाठी फारच जाचक असतं. 'युनिसेफ' या मुलांसाठी काम करणाऱ्या जागतिक संस्थेचा अहवाल सांगतो की, गेल्या १० वर्षांत जगभरात ठिकठिकाणी सुरू असलेल्या सशस्त्र संघर्षांमध्ये सुमारे २० लाख मुलं मारली गेली. ४० ते ५० लाख मुलांना अपंगत्व आलं. १ कोटी २० लाख मुलं बेघर झाली. १० लाखांहून अधिक मुलं त्यांच्या पालकांपासून विलग झाली.

संघर्ष सुरू असलेल्या काही देशांतील परिस्थिती तर फारच भयावह आहे. सीरियातील ९९ टक्के मुलं संघर्ष सुरू असलेल्या भागात राहात आहेत. अफगाणिस्तानच्या संघर्षात सर्वाधिक मुलं मारली गेली आहेत. लैंगिक हिंसाचाराला बळी पडलेल्या मुलांची सर्वाधिक संख्या सोमालियात आहे, तर नायजेरियामध्ये लढण्यासाठी सशस्त्र दलात भरती झालेल्या मुलांची संख्या सर्वाधिक आहे.

काही दिवसांपूर्वी युक्रेनच्या सोफिया या १३ वर्षांच्या शाळकरी मुलीने 'बीबीसी ब्रेकफास्ट'मध्ये विचारलं, "बॉम्बहल्ल्यांपासून वाचण्यासाठी लोक बंकर्समध्ये लपून बसले आहेत, तिथल्या आश्रयस्थानांत मुलं जन्म घेतायंत. लोकांची घरं बेचिराख झाली आहेत. रुग्णालयं, शाळा उद्ध्वस्त झाल्या आहेत. हे सारं का होतंय?" लहानग्या सोफियाने पोटतिडिकीने विचारलेला प्रश्न जणू युक्रेनच्या लाखो मुलांच्या मनातला प्रश्न आहे.

अफगाणिस्तान, सीरिया, येमेन, फिलीपाइन्स

आणि इराक या देशांत लढा देण्यासाठी शस्त्रं उचलणाऱ्या मुलांचं प्रमाण सर्वाधिक आहे. 'सेव्ह द चिल्ड्रन' संस्थेच्या एका सहयोगी संस्थेनं सुटका केलेल्या १७ वर्षीय जीनने सांगितलं की, "एकदा आम्ही मुलं नदीत पोहत असताना काही लोक आम्हांला जबरदस्तीनं जंगलात घेऊन गेले. कितीतरी दिवस त्यांनी आमचा छळ केला, आम्हांला मारहाण केली. आमच्यावर शस्त्रं उचलण्याची सक्ती केली. लोकांना कसं मारायचं आणि पळवून न्यायचं हे आम्हांला शिकवलं." जीनवर डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोतील सशस्त्र गटात सामील होण्यासाठी जबरदस्ती करण्यात आली होती.

## मुलांवर युद्धाचा परिणाम

युद्धाचा लहानग्यांवर वेगवेगळ्या पद्धतींनी परिणाम होतो.

- काही जणांना संघर्षात आई-बाबा गमवावे लागतात.
- युद्धकाळात कुटुंबाची पोटाची खळगी भरण्यासाठी पालक जास्त व्यग्र होतात. मुलांना त्यांचा सहवास पुरेसा मिळत नाही.



*'बीबीसी ब्रेकफास्ट'मध्ये युक्रेनची सोफिया तिचं मत मांडताना*

**☛ सोमालिया, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो, अफगाणिस्तान, सीरिया आणि आता युक्रेन या देशांतील मुलांवर युद्धाचा सर्वाधिक परिणाम झाला आहे.**

**☛ २४ फेब्रुवारी २०२२ रोजी युक्रेनवर रशियाने आक्रमण केल्यापासून, तिथल्या २० लाख मुलांना देश सोडून जाण्यास भाग पडले, असे 'युनिसेफ'ने म्हटले आहे. युक्रेनमधील ११ लाखांहून अधिक मुलांनी पोलंडमध्ये, तर हजारो लोकांनी रोमानिया, मोल्दोव्हा, हंगेरी, स्लोव्हाकिया आणि चेक प्रजासत्ताक येथे आसरा घेतला आहे.**

- युद्धादरम्यान शाळा झाली नाही तर शिक्षण मिळत नाही.
- निर्वासितांच्या छावण्यांत राहणारी मुलं तर भयाण वास्तव जगतात.
- युद्धात अपंगत्व आलेल्या मुलांनी केवळ आपला एखादा अवयव गमावलेला नसतो, तर त्याचसोबत आयुष्य भरभरून जगण्याच्या संधींना ते कायमचे मुकतात.
- ताजे, पौष्टिक अन्न, शुद्ध पाणी, स्वच्छता, राहायला घर, आरोग्यसेवांची उपलब्धता

# चार पायांचा सैनिक!

**पॅट्रन** हा युक्रेनच्या सैन्यदलांच्या ताफ्यातला एक चार पायांचा सैनिक आहे! युक्रेनमध्ये रशियाने पेरलेले शेकडो भू-सुरुंग याने शोधून दिल्यामुळे ते निकामी करता आले. युक्रेनचे अध्यक्ष वालोदोमीर झेलेन्स्की आणि कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो या दोघांनी 'मेडल फॉर डेडिकेटेड सर्व्हिस' हा पुरस्कार देऊन पॅट्रनचा सन्मान केलाय.

पॅट्रन हा जॅक रसेल टेरिअर ब्रीडचा आहे. माणसापेक्षा श्वान मंडळींची वासाची संवेदना खूप जास्त असते. त्यामुळे संरक्षणाच्या कामात त्यांचा सहभाग घेतला जातो.

आणखी एक गंमत– 'जेरुसलेम पोस्ट'ने एक बातमी दिलीये. युक्रेनमध्ये नवं पोस्टाचं तिकीट येऊ घातलंय. त्या तिकिटावर कुणाची छबी असावी यासाठीचा पोल सुरू झालाय. 'मोस्कवा' ही युद्धनौका आणि पॅट्रन यांच्यात चुरस आहे. ज्याला सगळ्यात जास्त मतं, त्याचं चित्र त्या पोस्टाच्या तिकिटावर येणार आहे. कोणीही मत देऊ शकतं. तुम्हीही पॅट्रनला मत देऊ शकता!

भारतीय सैन्यदलं असोत की पोलीस, त्यांचे भलेदांडगे जर्मन शेफर्ड्स आणि गलेलठ्ठ लॅब्राडोर्स





आपण बघत असतोच. पॅट्रनला बघून त्या सगळ्यांची आठवण आली. पॅट्रनच्या निमित्ताने आज त्या सगळ्यांना thank you म्हणावंसं वाटलं!

**-भक्ती बिसुरे**

*bhaktibisure@gmail.com*

या गोष्टींची चणचण होऊ शकते.

- अशाने मुलांचं आरोग्य बिघडतं, त्यांची प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते.
- निर्वासित मुलं कुपोषण आणि संसर्गजन्य आजारांना बळी पडतात.
- युद्धादरम्यान लसीकरण राहून जातं, ज्यामुळे बालमृत्यूंचं प्रमाण वाढतं.
- युद्धात दहशत, भयावह, प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागल्याने, मानसिकदृष्ट्याही मुलं खचतात.

● युद्धादरम्यान मुलं त्यांच्या समुदायापासून, त्यांच्या संस्कृतीपासून विलग होतात.

'युनिसेफ', 'सेव्ह दि चिल्ड्रन' यांसारख्या संस्था संघर्षमय भागातील मुलांसाठी सुरक्षित आणि अनुकूल निवारा देण्यासाठी धडपड करतात. तिथल्या मुलांना शिकता यावं, खेळता यावं, याकरिता विशेष सुविधा तयार केल्या जातात. त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. मुलांच्या हक्कांसदर्भातील धोरण बनविण्यातही अशा संस्था मार्गदर्शन करतात.



## झुंज देणारी धाडसी मुलं!

युद्धाच्या छायेत जगावं लागलेली बहुतांश मुलं चिवटपणे परिस्थितीशी झुंज देतात. कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी मुलं शांततेनं जगण्याचा प्रयत्न करताना दिसतात. जे आहे, ते सर्वांमध्ये वाटून घेतात. समस्या उद्‌भवतात, तेव्हा आपल्या परीनं एकत्रितपणे उपाय शोधतात. जेव्हा अन्न, पाणी, खेळणी अथवा इतर कोणत्याही वस्तूंची कमतरता भासते, तेव्हा गरजा पूर्ण करण्यासाठी पराकोटीची सर्जनशीलता दाखवावी लागते. एका पालकाने कारचे सीट बेल्ट वापरून मुलांसाठी झोपाळा बनवला. बर्फाळ प्रदेशातल्या अनेक मुलांनी उपलब्ध घरगुती सामानांतून स्की साधनं बनवली आणि स्कीइंग करण्याचा प्रयत्न केला.

प्रतिकूल परिस्थितीत जगतानाही मुलांना युद्धापूर्वीचा रम्य काळ आठवत असतो, त्यांची स्वप्नं जागी असतात. या जोरावर ते वर्तमान निभावून नेतात. युद्धप्रवण भागांमध्ये अंधाऱ्या तळघरात राहण्याचीच गोष्ट घ्या... मुलं जेव्हा अंधाऱ्या तळघरात एकत्र बसलेली असतात, तेव्हा त्यांच्यासाठी तो एक सर्वसामान्य अनुभव असतो. त्यांना तो वाईट, अपमानास्पद अनुभव वाटत नाही. निर्वासित छावणीत राहणारा एक मुलगा सांगत होता, 'निर्वासित छावणीत मिळणारी डाळ मला आणि माझ्या भावाला आवडायची, पण आमच्या पालकांना मात्र ती फार वाईट लागायची." मुलांमध्ये अन्नाबद्दलचे पूर्वग्रह नसतात!

युद्धप्रवण प्रदेशांतील लहानग्यांमध्ये 'पॉझिटिव्हिटी' असते. लवकरच छान दिवस येतील, यांवर मुलांचा विश्वास असतो. "मला शिक्षक व्हायचंय, पुढच्या पिढीला शिक्षित करायचंय, कारण शिक्षणामुळे शांतता येते." हे एका अफगाण निर्वासित मुलीचं वाक्य म्हणूनच मनावर कोरलं जातं. युद्धामुळे आपलं बालपण हरवून बसलेल्या अशा लाखो लहानग्यांना म्हणूनच कडक सलाम!

**-सुचिता देशपांडे**
*suchitaadeshpande@gmail.com*
(ज्येष्ठ पत्रकार)

*(लेखातील फोटो इंटरनेटवरून साभार)*

# कच्चे पक्के

**विज्ञानाची फोडणी दिलेली धमाल गोष्ट-**

**आज** रविवार. सकाळी आजी-आजोबा मंडईत जाऊन ताजी ताजी भाजी आणि फळं घेऊन आले. गवार, भेंडी, सिमला मिरची आणि कोबी. केळी आणि सफरचंद पण आणली. अन्वयने छोट्या जाळीदार पिशव्या आणल्या.

आता ही भाजी स्वच्छं धुवायची. पुसायची आणि फ्रिजमधे ठेवायची.

अन्वय लागला कामाला. पिशव्यांचे आकार पाहून त्याप्रमाणे त्याने भाज्या ठेवल्या.

नंतर एका पिशवीत सफरचंद ठेवली.

आणि मग त्याने पिशवीत ठेवण्यासाठी केळी उचलली तर केळ्यांकडे पाहात आजी म्हणाली, "नको..नको."

"अगं नको.. नको काय? तुला नको तर खाऊ नकोस पण मी खाईन की.."

"अरे मीसुद्धा खाईन, पण.."

"अगं आज्जेऽऽ म.. नको का म्हणतेस?"

"अरे अन्वू, केळी फ्रिजमध्ये ठेवू नकोस.."

"का? ती ताजी नाहीत का? तू तर नेहमी म्हणतेस की, ताज्या भाज्या फ्रिजमध्ये ठेवल्या की ताज्याच राहतात."

"हो. खरंय."

"म..म मला सांग सफरचंद फ्रिजमध्ये ठेवून चालतात तर केळी का नाही ठेवायची? ही तर दोन्ही फळंच आहेत ना?"

"फ्रिजमध्ये आपण सर्व प्रकारच्या भाज्या, फळं चांगली राहावी म्हणून ठेवतो. पण केळ्याला फ्रिजमधली गार हवा सोसत नाही."

"पण का?"

"अरे, केळी हे



चित्र- गिरीश सहस्रबुद्धे

फळ उष्ण कटिबंधातील आहे. त्यामुळे गरम हवा, उष्णता या फळांना मानवते. कच्च्या केळ्यांचा घड झाडावरून उतरवला की तो पिकण्यासाठी खास उबदार जागेत ठेवतात. त्यामुळे केळी चांगली पिकतात. म्हणून तर पिकलेली केळी नेहमी उघडी, मोकळ्या हवेत ठेवतात."

"अगं आजी, खरं म्हणजे या उष्ण कटिबंधातल्या केळ्यांना गार हवेत मस्त फ्रेश वाटलं पाहिजे ना? पण तू तर म्हणतेस, त्या केळ्यांना गार हवा सोसत नाही. असं का?"

"केळी पिकत असताना किंवा केळ्याची पिकण्याची प्रक्रिया सुरू झाली की फ्रिजमधला थंडावा त्यांना सोसत नाही. कारण केळ्यामध्ये 'ऑरिडेझ' नावाचं संप्रेरक असतं. पिकलेलं केळं जर फ्रिजमध्ये ठेवलं तर ऑरिडेझमध्ये रासायनिक प्रक्रिया होऊन केळं काळं पडतं."

"मग मला सांग, समजा कच्ची हिरवी केळी फ्रिजमध्ये ठेवली तर ती पण काळी पडतील की तशीच हिरवी कच्ची राहतील?"

"चांगला प्रश्न विचारलास. पण मला सांग तुला काय वाटतं..?"

"अं.. कच्ची हिरवी केळी फ्रिजमध्ये ठेवली तर ती तशीच कच्ची हिरवी राहतील."

"शाबास! मला वाटतं, आता कच्ची कैरी फ्रिजमधे ठेवायची की पिकलेला हापूस आंबा फ्रिजमध्ये ठेवायचा, हे तुला सहज ओळखता येईल."

"हो तर. नक्कीच!"

"म्हणून तर 'मोकळ्या हवेत मन फुलतं, फळ पिकतं' ही चिनी म्हण लक्षात ठेव."


**-राजीव तांबे**

*rajcopper@gmail.com*

*(प्रसिद्ध बालसाहित्यिक)*


# कल्पकला

## संदूक



**साहित्य-** आयताकृती रिकामा बॉक्स, ॲक्रेलिक कलर्स, लहान आकाराचे मणी, क्ले, एक मोठा चपटा मणी, कार्डबोर्ड, वार्निश.

**कृती-** रिकाम्या बॉक्सला आतून सर्व बाजूंनी कार्डबोर्ड चिकटवून घ्या. त्यामुळे बॉक्सला मजबुती येईल. आता बॉक्सच्या बाहेरील बाजूवर फोटोत दाखविल्याप्रमाणे कार्डबोर्डचे तुकडे आणि छोटे मणी चिकटवा. बॉक्सच्या पुढील आणि दोन्ही बाजूंवर क्लेचे हँडल बनवून चिकटवा. समोरील बाजूवर एक मोठा चपटा मणी जाड दोऱ्याने अडकवून घ्या. हा मणी कुलपाप्रमाणे दिसेल.

आता संपूर्ण बॉक्सला काळ्या व चंदेरी रंगाने शेडिंग करत रंगवा. रंग वाळल्यावर त्याला वार्निश करा. अशा प्रकारे ही छोटीशी संदूक तयार होईल.


**-स्वरूपा वक्नाली**

*swarupamv@gmail.com*

# बहारदार शिबिराची मेजवानी

**‘बहुरंगी बहर’ या आपल्या प्रकल्पातील निवडक मुलांना बक्षीस म्हणून मिळते एक शिबिर. आपली ‘बहारदार’ मुलं या शिबिराची अगदी वाट बघत असतात, कारण त्यांच्या मनात खदखदणाऱ्या, वयाच्या या टप्प्यावर त्यांच्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या विषयांवर या शिबिरात चर्चा होते. यंदा हे शिबिर आम्ही ऑनलाइन घेतलं, कारण सर्व मुलांना एकत्र राहायला बोलावून त्यांच्या आरोग्याची जबाबदारी घेण्यासारखी परिस्थिती अजूनही नाही. ‘बहुरंगी बहर’च्या चार पर्वांतील मुलांसाठी ४ मे ते ८ मे दरम्यान असलेल्या या शिबिरात स्वत: डॉ. आंनद नाडकर्णी आणि ‘IPH’चे मानसतज्ज्ञ यांनी मुलांशी संवाद साधला. एक सत्र पालकांसाठीही होतं.**

**या शिबिराच्या वृत्तान्ताचा हा भाग १. हे वृत्तांकनही या प्रकल्पातील मुलांनीच केलं आहे.**



## आनंदकाकांशी गप्पा

यावर्षी पहिल्यांदाच ‘बहुरंगी बहर’चं शिबिर ऑनलाइन झालं, पण करोना काळात ‘हेही नसे थोडके’! शिबिर जरी ऑनलाइन असलं तरी त्यातलं ‘बहुरंगी’त्व छान जपलं गेलं होतं आणि डॉ. आनंदकाका (नाडकर्णी) यांच्याबरोबरचं सत्र म्हणजे तर Cherry on the top! कुठल्याही विषयात न बांधता, गप्पांची मैफिल रंगली. डॉ. काका आम्हा गप्पिष्ट मुलांसोबत गप्पा मारायला परफेक्ट कंपनी आहेत, यात वादच नाही. गप्पांना सुरुवात झाली ती आनंदकाकांच्या येऊ घातलेल्या ‘बुद्धांसोबत क्षणोक्षणी’ या संग्रहाच्या निर्मितिप्रक्रियेने!

‘Social Media’ या आमच्या पालकांची डोकेदुखी ठरलेल्या प्रकाराचा योग्य वापर कसा



करावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे आनंदकाका! अगदी Insta, Facebook या हल्लीच्या प्लॅटफॉर्मवर tech-savvy होत त्याचा वापर त्यांनी आपल्या कविता, लेखांमधून समाजप्रबोधन, मानसिक आरोग्य यांच्या प्रसारासाठी कसा केला, प्रतिक्रियांचे काही भन्नाट किस्से हे सगळं मजेदार शैलीत ऐकवलं.

डॉक्टर आनंदकाका हे निष्णात मनोविकास तज्ज्ञ आहेत हे तर आपल्या सगळ्यांना माहीत आहेच, पण जेव्हा त्यांना करिअर निवडण्याची वेळ आली तेव्हाचा स्वानुभव सांगत त्यांनी करिअर निवडीच्या प्रश्नावर भाष्य केले. 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' हा कानमंत्र देत त्यांनी करिअर ऑप्शनमुळे होणाऱ्या द्विधा मनःस्थितीला सामोरं जाण्याचा मार्ग सांगितला.

समाजात अनेक हृद्य घटना रोज घडत असतात. काही वेळेस त्याचे परिणाम आपल्यावर होतात, काही गोष्टी मनाला चटका लावून जातात. मग अशा वेळेस आपण काय करायचं, या प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी आपण सोडवलेल्या काही प्रश्नांचा संदर्भ दिला. जरी आपण समाजात होणाऱ्या वाईट गोष्टी थांबवू शकत नसलो, त्यांच्या परिणामांची दाहकता कमी करू शकत नसलो तरी आपल्याकडून जो काही खारीचा वाटा उचलता येऊ शकतो तो नक्कीच उचलला पाहिजे!

Emotional breakdowns, भावनांचे चढ-उतार हे माणूस म्हणून कोणालाच चुकलेले नाहीत, मग याचा निचरा कुठे व कसा करायचा हा प्रश्न सगळ्यांना असतो. त्यासाठी आनंदकाकांनी सांगितलेला उपाय आम्हांला पटला- Emotional Safety Net. कृती, विचार, भावना यांच्या Safety Netचा वेळोवेळी Maintenance कसा ठेवायचा, हेही त्यांनी सांगितलं.

ही रंगलेली गप्पांची मैफल कधी पूर्णविराम घेऊ नये असं प्रत्येकाला वाटतं होतं, कारण अवघड गोष्ट सोपी करून सांगण्याच्या आनंदकाकांच्या हातोटीमुळे प्रत्येकाला काही ना काही नवं उमजत होतं. यावर्षी आनंदकाकांची अशी ऑनलाइन भेट झाल्यामुळे दुधाची तहान ताकावर भागली गेल्याची भावना सगळ्यांमध्येच होती. पुढच्या वर्षी ही कसर प्रत्यक्ष भेटीतून भरून काढण्याचा निश्चय करत सगळ्यांनी एकमेकांचा निरोप घेतला.

**-सई काटकर** *(प्रथम वर्ष कला)*

## स्क्रीन व उपकरणांचा वापर

सध्याच्या काळात स्क्रीनचा वापर किती करावा ह्याचं भान असणं गरजेचं आहे. शिबिरातील एक सत्र 'स्क्रीन व उपकरणांचा सुयोग्य वापर' याच विषयावर होतं. मार्गदर्शन करणाऱ्या आयेशा खान आणि ऋजुता चित्रे या दोघींनीही मानसशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतलेलं असून त्यांना पौगंडावस्थेतील मुलांबरोबर काम करण्यात विशेष रस आहे, अशी त्यांची ओळख शुभदामावशीने करून दिली.

दुपारच्या वेळेमुळे किंचित पेंगुळलेल्या आमच्या मनांना ताजंतवानं करण्यासाठी त्या दोघींनी एका Activity ने सत्राची सुरुवात केली. करोनाच्या काळात काम, अभ्यास, करमणूक, बातम्या, संवाद या सगळ्यासाठी स्क्रीन हा एकमेव उपाय बनला होता. आता आपल्याला प्रत्यक्ष आणि व्हर्च्युअल यातला योग्य बॅलन्स राखत पुढे जाणं हा एकच पर्याय आहे.

व्हर्च्युअल असण्याचे फायदे-तोटे यावर आम्ही चर्चा केली. सोशल मिडियामुळे अनेक बाह्य उत्तेजना आपल्याला सतत मिळत असतात. नवीन गोष्टींसाठी exposure मिळणे, छंद जपायला प्रोत्साहन मिळणे, जागरूकता निर्माण होणे हे सोशल मीडियाच्या प्रभावाचे फायदे आहेत. याउलट प्रसिद्ध व्यक्तींशी स्वतःची गैरवाजवी तुलना करणे, फोमो (fear of missing out) मुळे न पटणाऱ्या गोष्टी कराव्या लागणे आणि सोशल मीडिया appsच्या अल्गोरिदममुळे ध्रुवीकरण होणे हे सर्वात घातक परिणाम आहेत.

ह्या चर्चेमुळे सोशल मीडियाबद्दलच्या आम्हांला न पटणाऱ्या गोष्टी आम्हांला समोर ठेवता आल्या. त्या दोघी वेळोवेळी आम्ही मांडलेल्या मुद्द्यांमध्ये आणखीन भर घालत होत्या. यातून झालं असं की, सोशल मीडियाची निगेटिव्ह बाजू आमच्या मार्फतच पुढे आली.

त्यानंतर आयेशाताईने screen time कमी करण्यासाठी practical सल्ले दिले. ऋजुताताईने ती स्वतः या बाबतीत काय करते ते सांगितलं. आणि कुठलंही तंत्र वापरलं तरी स्वतःवर देखरेख ठेवणं हेच सगळ्यात महत्त्वाचं आहे हेही पटवून सांगितलं.

हे सत्र खूप परिणामकारक झालं. Relatable उदाहरणांमुळे त्यांचे मुद्दे जवळचे वाटले.

**-मुक्ता परांजपे** *(प्रथम वर्ष BAMS)*

## फिटनेस आणि स्पोर्ट्‌सचं महत्त्व

डिजिटल काळात मैदानी खेळ किंवा फिटनेस ठेवणं हे खूप गरजेचं आहे. यावरच आमचं हे सत्र होतं. या सत्रात आम्ही सर्वांनी मानसोपचार तज्ज्ञ असणाऱ्या तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू असणाऱ्या दोन ताईंशी- डॉ. देविका पाटील आणि राधिका धारप यांच्याबरोबर मनसोक्त गप्पा मारल्या. ‘आयर्नमॅन’ या खडतर स्पर्धेतील इंडियन रेकॉर्ड होल्डर आणि एमडी सायकॉलॉजी असणारी देविकाताई तसेच आंतरराष्ट्रीय जिमनॅस्टिकमध्ये भारताचं प्रतिनिधित्व करणारी राधिकाताई या दोघींनीही आमच्याशी गप्पा मारत खेळाचं महत्त्व आम्हांला पटवून दिलं.

सत्राची सुरुवात खेळीमेळीच्या वातावरणात, एका क्विझने झाली, ज्यामध्ये २० प्रश्न होते आणि त्यातही प्रत्येकाला पॉइंट्‌सदेखील मिळत होते. देविकाताईने कशाप्रकारे एम.डी.ची परीक्षा देत आयर्नमॅन स्पर्धेची तयारी करत विविध अडचणींना सामोरं जात यश मिळवलं त्याची गोष्ट सांगितली, ती गोष्ट खूपच प्रेरक होती. तसंच राधिकाताईसुद्धा बारावीची परीक्षा देत असतानाच तिने किती स्पर्धा खेळल्या आणि नंतर कशी वर्ल्ड कपमध्येही ती खेळली हे ऐकल्यावर तर आपण जर वेळेचं योग्य नियोजन केलं तर किती गोष्टी साध्य होऊ शकतात याचं गणित आपसूकच डोक्यात आकार घ्यायला लागलं.

आपल्याला आपल्या क्षेत्रात कायम चांगलं काम करण्यासाठी फिटनेस कसा राखावा, मधुमेहासारख्या आनुवंशिक आजारांना दूर ठेवण्यासाठी खेळ कसे उपयुक्त आहेत, या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयांवरची चर्चा सर्वांनाच खूप भावली. त्यानंतर प्रश्न-उत्तरांच्या वेळात आम्ही मनातले प्रश्न विचारले. ‘भारतात केवळ क्रिकेटला मिळणारी लोकप्रियता खेळसंस्कृतीसाठी घातक का




पूरक?' 'खेळावरचा राजकारणाचा प्रभाव', 'खेळासाठी आवश्यक मानसिकता', 'गेमिंग कल्चर', 'खेळाडूंचे तणाव व्यवस्थापन' अशा विविध विषयांवर चर्चा होऊन सर्वांनाच आपापल्या प्रश्नांची समर्पक उत्तरं मिळाली. सत्राचा शेवट करताना काहीही झालं तरी आयुष्यात खेळाची साथ सोडू नका आणि किमान एक तरी खेळ खेळा- हा संदेश या दोन्ही ताईंनी दिला.

एकंदर शिबिर फारच मस्त झालं. मात्र आम्हांला सगळ्यांना प्रत्यक्ष भेटून शिबिराची मजा घ्यायची आस आहे. ती इच्छा लवकरच पूर्ण होवो.

**-सोहम प्रिया, आभा गोकर्ण** *(इयत्ता-अकरावी)*

शिबिर वृत्त, भाग २- पुढच्या अंकात

# मोबाइलचे युग

**उदगीर साहित्य संमेलनात 'वयम्'च्या साहित्य दालनात आपल्या 'वयम्'ची वाचक आणि छोटी कवयित्री गायत्री शेरीकरने कविता सादर केली. चला, आपणही वाचू या!**

घर घेताना आधी परिसर बघायचे
आता नेटवर्क कव्हरेज आहे का बघतात
स्वागत आहे तुमचे या मोबाइलच्या युगात...
कंटाळा आल्यास आधी गप्पा मारायचे
आता Online चॅटींगमध्ये रमतात
स्वागत आहे तुमचे या मोबाइलच्या युगात...
प्रवासात आधी रस्त्यांचा आनंद लुटायचे
आता गुगल मॅपच्या रस्त्यात गुंततात
स्वागत आहे तुमचे या मोबाइलच्या युगात...
खेळताना आधी विटीदांडू आणि गोट्या खेळायचे
आता पबजी आणि फ्री-फायरमध्ये भांडतात
स्वागत आहे तुमचे या मोबाइलच्या युगात...
उठल्याबरोबर आधी व्यायामाने स्वतःला चार्ज करायचे
आता मोबाइलचे चार्जर शोधत फिरतात
स्वागत आहे तुमचे या मोबाइलच्या युगात...
आधी लोक घरात असायचे
आता नेटवर्क कव्हरेज क्षेत्रातसुद्धा नसतात
स्वागत आहे तुमचे या मोबाइलच्या युगात...
आधी जीवनात आनंद असल्यास छान वाटायचे
आता मोबाइलमध्ये चार्जिंग असल्यास छान वाटते
स्वागत आहे तुमचे या मोबाइलच्या युगात...
आधी लोक लँडलाइनमुळे नात्यांशी जोडले जायचे
आता मोबाइलमुळे हवेतच उडतात
स्वागत आहे तुमचे या मोबाइलच्या युगात...

**-गायत्री शेरीकर**, *आठवी,*
*श्रीकिशन सोमाणी विद्यालय, लातूर*

# पक्षी आणि झाडं - गहिरं नातं!

**‘पक्षी** आणि झाडं’ हा माझ्या अभ्यासाचा विषय आहे आणि चित्रांचाही. पक्षी आणि झाडांचं नातं किती अतूट आहे, त्याचा अभ्यास मी करत असते. झाडांचा प्रसार (बीज-प्रसरण) करण्यासाठी पक्षी मोठी भूमिका बजावतात. धनेश (हॉर्नबिल) पक्ष्याला ‘गार्डनर्स ऑफ द फॉरेस्ट’ (जंगलातले माळी) म्हणतात. वड, पिंपळ, उंबर अशा महावृक्षांचा बीजप्रसार ती खूप दूरवर करू शकतात. जैवविविधता जपण्यासाठी अशा वृक्षांचा प्रसार महत्त्वाचा आहे. धनेश मोठी फळंसुद्धा सफाईने खातात आणि त्यातल्या बिया सुरक्षित दूरवर पोचतात. जंगलात हॉर्नबिल असणं म्हणजे जंगलाचा दर्जा (Biodiversity) चांगला आहे, असं समजायचं!

या बदल्यात झाडं धनेशला निवारा देतात. उंचच उंच झाडांच्या ढोलीचा वापर धनेश वर्षानुवर्षं करतो. जंगल समृद्ध झालं की आपोआपच इतर जीव तिथे सुखाने नांदतात. छोट्या कीटकांपासून ते हत्तीपर्यंत सगळेच जीव समृद्ध जंगलावर अवलंबून असतात! परिसरातील कपोकाच्या (पांढरी सावर)



**आपल्या मासिकाच्या एप्रिल अंकाचं आणि या जूनच्या अंकांच कव्हर जिने साकारलंय, तिचं हे मनोगत. तिच्या चित्रांमागे तिचा अभ्यास आहे.**

झाडाकडे लक्ष द्या. सध्याच्या या दिवसात त्याच्या शेंगांमधून कापूस बाहेर यायला लागतो. लगेच सूर्यपक्षी (Sunbird), शिंपी (Tailor Bird), वटवट्या (Ashy Prinia) तो गोळा करायची लगबग करतात. हा कापूस ते घरट्याच्या आत अंथरायला वापरतात. कापूस नेताना सोबत बियाही दूरवर नेल्या जातात. साहजिकच बीजप्रसार होतो.

फॉरेस्ट आऊलेट किंवा डूडा हा एक लुप्त होण्याच्या मार्गावर असलेला पक्षी. यालासुद्धा दिवसा सागाच्या झाडाचा उपयोग निवाऱ्यासाठी होतो. सागाच्या सुकलेल्या राखाडी पानांमध्ये ते अगदी एकजीव होऊन बसतात (Camouflage)! कपोकासारख्या झाडांचा उपयोग तांबट घरटं करण्यासाठी करतात. त्याचं लाकूड मऊ असल्याने त्यांना चोचीने छिद्र पाडायला सोपं जातं.

सुगरण नेहमी बाभळीच्या झाडांचा उपयोग झुलता बंगला बांधण्यासाठी करतात. त्याच्या काट्यांमुळे त्यांचं संरक्षण होतं. पळसाला येणाऱ्या फुलातील मधासाठी हिवाळी पाहुणे पक्षी दूरदुरून येतात. त्यांना त्यांच्या परतीच्या प्रवासासाठी हे मध शक्तिवर्धक ठरतं.

ऐन, बेहडा, हळदू, अर्जुन आणि जांभळासारख्या विशालकाय उंच वृक्षांचा उपयोग अनेक शिकारी पक्षी घरटी करण्यासाठी करतात. चिंचेसारख्या महावृक्षांचा वापर बगळे, ढोकरी, पाणकावळे घरटी बनवण्यासाठी करतात. अशा एखाद्या महाकाय झाडावर शेकडो पक्षी एकाच वेळी निवास करताना दिसतील. अशी अनेक उदाहरणं देता येतील.

म्हणजे कोणते पक्षी कोणकोणत्या झाडांशी कसं नातं जोडतात, हे बघणं फार रोचक आहे. ही निरीक्षणं मी माझ्या चित्रांत उतरवण्याचा प्रयत्न करते.

तुम्ही या पावसाळ्यात एक तरी झाड लावून त्याची जोपासना करणार ना? आणि ते झाड कसं वाढतं, त्याबरोबर आणखी काय काय घडतं, तेही नीट बघा!



**-भाग्यश्री पटवर्धन**
*bhgya2510@gmail.com*
*(निसर्ग अभ्यासक)*




'जंगल बुक'चे सुप्रसिद्ध लेखक रुडयार्ड किपलिंग यांचा जन्म १८६५मध्ये मुंबई येथे झाला होता. भारतातील निसर्ग आणि प्राणी-जीवन यांवर आधारित अनेक कथाकादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यात प्राण्यांच्या बारीकसारीक लकबींचे सुंदर चित्रण येते. पण खरे तर त्या गोष्टी प्राण्यांच्या नाहीत. माणसांचेच गुण, अवगुण, चारित्र्य, भावभावना त्यांत दिसतात. शूरवीर रिकी-टिकी-टावीची ही गोष्टही त्यांपैकीच एक. हा तिचा संक्षिप्त आणि स्वैर अनुवाद.

# रिकी-टिकी-टावी


**सुगौलीच्या** छावणी भागातील भल्याथोरल्या बंगल्याच्या न्हाणीघरांमधून रिकी-टिकी-टावीने अगदी एकट्याने जे घनघोर युद्ध केलं, त्याची ही गोष्ट. हां, आता शिंपी पक्ष्याने त्याला मदत केली आणि भिंतीच्या कडेकडेने फिरणाऱ्या चुचुंदरने त्याला सल्ला दिला हे खरं, पण प्रत्यक्ष लढाई तर रिकी-टिकी-टावीनेच केली.

रिकी-टिकी-टावी हा एक छोटा मुंगूस होता. लालगुलाबी डोळे आणि नाकाचा शेंडा, दाट केस, फुलारल्यावर बॉटलब्रशसारखी दिसणारी शेपटी, पुढच्या किंवा मागच्या कुठल्याही पायाने शरीराच्या कुठल्याही भागावर सहज खाजवता येईल असं अगदी लवचीक अंग आणि उंच गवतातून सर्रकन जातानाची त्याची ललकारी-- "रिक-टिक-टिकी-टिकी-चक"!

एके दिवशी अचानक आलेल्या पुराच्या जोरदार लोंढ्याबरोबर तो त्याच्या आईबाबांच्या बिळातून बाहेर फेकला गेला आणि दूर वाहत गेला. त्याला शुद्ध आली तेव्हा तो एका बागेत होता.

"हे तर मेलेलं मुंगूस दिसतंय, आपण नीट पुरूया का त्याला?" एक छोटा मुलगा म्हणत होता. त्याचं नाव टेडी.

"नको, आधी त्याला स्वच्छ कोरडं करू, कदाचित जिवंतही असेल ते," त्याची आई म्हणाली.





स्वच्छ पुसून मऊ कापसात, उबेत ठेवल्यावर थोड्या वेळाने रिकी-टिकी-टावीने डोळे उघडले आणि शिंक दिली.

“हां, आता घाबरवू नका त्याला, बघू ते काय करतंय.” बाबा म्हणाले. ते इंग्रज अधिकारी होते आणि आपल्या कुटुंबाला घेऊन नुकतेच त्या भल्यामोठ्या बंगल्यात राहायला आले होते.

मुंगुसाला घाबरवणं हे खरं तर मोठं कठीण काम असतं. त्याच्या नाकाच्या शेंड्यापासून शेपटीच्या टोकापर्यंत कुतूहल आणि उत्सुकता अगदी ठासून भरलेली असते. “चला शोधून काढा!” हे त्यांचं ब्रीदवाक्य. शुद्धीवर आल्यावर रिकी-टिकीने ताबडतोब शोधकार्याला सुरुवात केली. आधी टेबलवर, मग थेट छोट्या टेडीच्या खांद्यावर, त्याच्या कानाशी हुंगून मग जमिनीवर, घरातून बाहेर व्हरांड्यात, मग परत दारापाशी असा त्याचा मुक्त संचार सुरू झाला. “त्याला थोडं खायला देऊया. ते मजेत राहीलसं दिसतंय आपल्याकडे.” बाबा म्हणाले.

रिकी-टिकी-टावीला हे घर फारच आवडलं. शोधून काढण्यासारख्या अगणित गोष्टी तिथे होत्या. पण रात्री रिकी-टिकी-टावीला टेडीच्या अंथरुणात, उशीवर पाहून टेडीच्या आईला काळजी वाटायला लागली, “चावलं तर?”

“शक्य नाही,” बाबा म्हणाले. “उलट एखाद्या जातिवंत कुत्र्यापेक्षा जास्त चांगली राखण करील ते.”

सकाळी लवकर उठून, थोडंसं खाऊन रिकी-टिकी-टावी बंगल्याभोवतीच्या आवारात चक्कर मारायला निघाला. आवार भलंमोठं होतं. काही फळझाडं, इतर झुडपं, बांबूची आणि उंच वाढलेल्या गवताची घनदाट बेटं, आणि काही भागात तर नुसतं रान माजलं होतं. “शिकार करण्यासाठी अगदी अप्रतिम जागा!” रिकी-टिकी-टावी उद्गारला. बागेतून सुर्रकन इकडून तिकडे त्याची भ्रमंती सुरू असताना मध्येच त्याला एका काटेरी झुडपाजवळ कोणीतरी दुःखी आवाजात बोलताना ऐकू आलं. दोन मोठी पानं धाग्याने एकत्र शिवून आत मऊ कापूस भरून शिवलेलं एक सुंदर घरटं वाऱ्यावर हेलकावत होतं. त्याच्या कडेला बसलेली शिंपी पक्ष्यांची जोडी रडत होती.

“काय झालं?” रिकी-टिकी-टावीने विचारलं.

“काल आमचं एक पिल्लू घरट्यातून खाली पडलं, ते नागाने खाल्लं!”

“अरेरे! पण मी नवीन आहे या भागात, मला सांगा, हा नाग कोण आहे?”

त्याला उत्तर देण्याऐवजी शिंपी पक्ष्यांची जोडी भिऊन घरट्यात शिरू लागली, कारण तेवढ्यात त्या झुडपाच्या खाली गवतातून ‘फिस्स’ असा अंगावर शहारे आणणारा थंडगार आवाज आला होता. गवतातून इंचाइंचाने नागाचं डोकं वर येत होतं. भला मोठा काळा फड्या नाग. आपलं एक तृतीयांश शरीर उंच तोलून धरल्यावर तो झुलू लागला. मनात काय चाललं आहे, याचा थांग न लागू देणाऱ्या जहरील्या नजरेनं त्याने रिकी-टिकी-टावीकडे पाहिलं. “नाग कोण आहे? मी आहे नाग! फड्या नाग! बघ माझ्या फण्यावरचं पवित्र चिन्ह! धडकीच भरेल तुला!”

फणा काढलेला नाग पाहून रिकी-टिकी-टावीला खरोखरच क्षणभर धडकी भरली, पण कुठलंच मुंगूस



फार काळ घाबरून राहात नाही. शिवाय रिकी-टिकी-टावीने त्याआधी कधी नाग पाहिला नसला, तरी आईने भरवलेले नागाचे तुकडे खाल्ले होते. त्यामुळे नागाला ठार मारून खाणं हे मुंगुसाचं कामच आहे, हे त्याला माहीत होतं. "ते चिन्हांचं राहू दे," रिकी-टिकी-टावी आपली शेपटी फुलवत म्हणाला, "पण घरट्यातली पिल्लं खाणं बरोबर आहे का?"

रिकी-टिकी-टावी आणि त्याच्या मागच्या गवतातली हालचाल नाग बारकाईने न्याहाळत होता. मुंगूस म्हणजे प्राणाशी गाठ हे त्याला माहीत होतं. रिकी-टिकी-टावीला बेसावध ठेवण्यासाठी त्याने आपली फडा थोडी खाली एका बाजूला घेतली आणि म्हणाला, "हे बघ, बोलूया आपण जरा. तू नाही का आज उकडलेलं अंडं खाल्लंस? मग मी पक्षी खाल्ला तर काय होतं रे?"

"मागे बघ, तुझ्या मागे बघ!" शिंपी पक्षी ओरडला.

रिकी-टिकी-टावीने मागे बघण्यातसुद्धा वेळ घालवला नाही आणि क्षणार्धात शक्य तितकी उंच उडी मारली. गुपचूप त्याच्या मागून येऊन जीवघेणा हल्ला करणाऱ्या नागिणीचा नेम त्यामुळेच चुकला. ती जोरात फुत्कारली. उडी घेतलेला रिकी-टिकी-टावी खाली आला, तो तिच्या पाठीवरच. रिकी-टिकी-टावी अनुभवी, वयाने मोठा असता, तर एकाच चाव्यात तिच्या पाठीचा कणा कायमचा मोडून टाकण्याची ही उत्तम संधी आहे, हे त्याला उमगलं असतं, पण तो अजून लहान होता. नागीण मागून शेपटीचा तडाखा देईल, अशी त्याला भीती वाटत होती. त्यामुळे पटकन एक चावा घेऊन तो लगेच दूर झाला. नागीण जखमी झाली, चवताळली.

"शिंप्या, दुष्टा," नाग ओरडला, पण शिंप्याचं घरटं उंचावर होतं, तिथपर्यंत पोचणं नागाला शक्य नव्हतं. इकडे रिकी-टिकी-टावीचे डोळे संतापाने लालेलाल होत होते. मागच्या पायांवर बसून, इकडेतिकडे पाहत तो रागाने चित्कारत होता. पाहता पाहता नाग आणि नागीण दोघेही गवतात दिसेनासे झाले. रिकी-टिकी-टावी त्याच्या मागे गेला नाही. दोघांशी एकदम लढता येईल अशी त्याला खात्री नव्हती. पण दुखावलेले नाग हे गंभीरच प्रकरण होते, आता पुढे काय, याचा विचार करायलाच हवा होता.

नाग-मुंगुसाच्या लढाईत विजय मिळवून देणाऱ्या निर्णायक गोष्टी दोनच; तिखट नजर आणि चपळाई. पापणी लवायच्या आत नाग दंश करू शकतो. असा विजेच्या वेगाने आणि तोसुद्धा पाठीमागून आलेला वार आज आपल्याला चुकवता आला, म्हणून रिकी-टिकीला फार छान वाटत होतं, पण तरीही दिवसभर तो सावध होता. खाणंसुद्धा त्याने जास्त खाल्लं नाही, कारण सुस्त मुंगूस म्हणजे मंद मुंगूस. लढाई करायची तर सुस्ती येऊन चालणारच नव्हतं.

रात्र झाली. टेडीला झोप लागल्यावर रिकी-टिकी तडक घराभोवती गस्त घालायला निघाला. अंधारात त्याची गाठ पडली ती भिंतीच्या कडेकडेने फिरणाऱ्या गरीब बिचाऱ्या चुचुंदरशी. "मला मारू नको, दया कर, मला मारू नको," चुचुंदर गयावया करत म्हणाला.

"सापाला ठार करणारे लोक चिचुंद्र्या मारतात, असं वाटतं का तुला?"

"जे सापांना मारतात, तेही सापांच्या हातून मरू

शकतात. आणि अंधारात चुकून साप मलाच मुंगूस समजला तर?"

दुपारी रिकी-टिकीने अंगणात एक छोटासा दिसणारा पण अतिविषारी मण्यार साप मारला होता, त्यावरून हे सगळं संभाषण चाललं होतं.

"असं काही होणार नाही. नाग बाहेर आहे, आणि तू तर आत आहेस." रिकी-टिकी म्हणाला.


"काय सांगू, तुला माहीत नसेल, पण नाग आज सगळीकडे फिरतो आहे! ऐक, नीट कान देऊन ऐक!"

रिकी-टिकी सावधपणे लक्षपूर्वक ऐकू लागला. घरात सामसूम होती, पण बाहेर भिंतीजवळ बारीक खसपस ऐकू येत होती. न्हाणीघराबाहेर मोरीच्या तोंडाशी कुजबूज चालली होती ती नाग आणि नागिणीचीच!

"माणसांना मारून काय मिळणार?" नाग म्हणत होता.

"काय म्हणजे, माणसं नव्हती, तेव्हा मुंगूस होतं का इथे? माणसांमुळेच तो आहे इथे. तीच नसतील, तर तोही जाईल ना! मग आपलंच राज्य!" नागीण म्हणाली.

"खरंय, मी हा विचारच केला नव्हता. आता मी आत जाऊन गुपचूप आधी त्या माणसाला, मग त्याच्या बायकोला आणि जमलं तर मुलालाही मारूनच बाहेर येतो!"



हा भयंकर डाव ऐकल्यावर रिकी-टिकीच्या अंगावर सरसरून काटा आला. त्याचवेळी त्याने मोरीच्या भोकातून नागाचं लांबलचक धूड सावकाश सरपटत आत शिरताना पाहिलं. त्याला खूपच भीती वाटायला लागली. आत शिरल्यावर नाग तसाच सावकाश अंघोळीचं पाणी भरण्याच्या हंड्याजवळ गेला. "ऐकतेस का गं, सकाळी तो माणूस इथेच येईल अंघोळीला. तेव्हा त्याच्या हातात काठीबिठी काही नसेल. ती वेळ उत्तम. तोवर इथेच थांबतो मी गारव्याला."

नागाच्या बोलण्याला बाहेरून काहीच उत्तर आलं नाही, त्यामुळे नागीण आता दूर गेली असावी हे रिकी-टिकीने ओळखलं.

हंड्याला वेटोळे घालून नाग झोपी जाईपर्यंत रिकी-टिकीने एवढीशी सुद्धा हालचाल केली नाही. स्तब्ध राहून तासभर त्याने वाट पाहिली. मग अगदी सावकाश, एका वेळी एकेकच सावध हालचाल करत तो हंड्याकडे सरकू लागला. "पहिल्याच उडीत नागाचं कंबरडं मोडलं पाहिजे, तो जर उलटून लढाईला आला, तर रिकी, मग तुझं काही खरं नाही." तो मनाशी म्हणत होता. "उडी शेपटीवर नको, त्यात धोका आहे. आणि ही भली जाडजूड गर्दन, ती काही मला झेपणार नाही. डोकं! त्याचं डोकं आधी धरायचं आणि सोडायचंच नाही!" ठरलं!

नागाचं डोकं हंड्यापासून थोडं दूर एका बाजूला होतं, तिथेच झेप घेऊन रिकी-टिकीने चावा घेतला, दात गच्च रुतवले, आणि हंड्याला पाठ टेकून जोर लावून नागाचं डोकं खाली दाबलं. दुसऱ्याच क्षणी नाग बेफाम होऊन त्याला इकडे, तिकडे, खाली, वर, गोल फिरवून, हंड्यावर, जमिनीवर आपटू लागला. रिकीची सगळी हाडं खिळखिळी झाली, मार लागून त्याच्या सगळ्या अंगाला ठणका लागला. पण पकड सैल करायची नाही असा त्याचा निश्चयच होता. त्याला भोवळ आली तरी

त्याने आपली पकड सोडली नाही. न्हाणीघरातील तांब्या, साबण, ब्रश, सगळया गोष्टी या धुमश्चक्रीत गडगडत उधळल्या गेल्या. त्या आवाजाने घरातील माणसांना जाग आली. काय होतं आहे हे पाहताच बाबांनी नागाच्या पाठीवर शॉटगनची बॅरल्स रिकामी केली. रिकी-टिकीच्या पाठीशी जणू वीजच पडली! जाळ उठला आणि त्याच्या अंगावरचे केसही थोडे जळले. आपण आता मरतो अशी त्याची खात्रीच पटली. पण नाही, उलट त्याच्या पकडीतलं नागाचं डोकं मात्र निर्जीव होऊन पडलं होतं. बाबांनी रिकी-टिकीला अलगद उचललं. "आज या छोट्या मुंगुसाने आपले प्राण वाचवले." ते म्हणाले.

सकाळ झाली तेव्हाही रिकी-टिकीचं सगळं अंग ठणकत होतं, पण तो आपल्या कामगिरीवर खूश होता. "आता राहिली ती नागीण आणि तिची अंडी!" तो मनाशी म्हणाला. "शिंपी पक्षी काय म्हणतो, पाहू."

शिंपी पक्षी तर मुक्तकंठाने रिकी-टिकीच्या पराक्रमाचं आणि नाग मेल्याच्या आनंदाचं गाणं गात बसला होता!

"ही काय गाणं गात बसायची वेळ आहे का! अजून युद्ध संपलेलं नाही." रिकी-टिकी थोडा रागावून म्हणाला, "नागीण कुठे आहे ते सांग आधी."

"ते नागाचं कलेवर कचऱ्याच्या ढीगावर टाकलं आहे, तिथे असेल!"

"आणि तिची अंडी?"



"तिथेच खरबुजाच्या वाफ्यात, भिंतीच्या बाजूला! तू ती आता खाणार की काय!!"

"नाही, तसं नाही, पण एक काम कर." रिकी-टिकी म्हणाला. "तू नागिणीसमोर जाऊन तुझा पंख तुटल्याचं नाटक कर, आणि तिला तुझा पाठलाग करायला लावून इकडे आण. मला ती नसताना तिथे जायचं आहे."

शिंपी पक्ष्याला हे काही कळलं नाही, पण पक्षिणीला कळलं. तिकडे नागिणीसमोर जाऊन ती खुरडत खुरडत चालायला लागली. "अगं आई गं! पंख तुटला माझा! त्या माणसाच्या पोराने दगड मारला!"

"त्या रिकी-टिकीला मी मारणार होते, तेव्हा ओरडून त्याला सावध करणारी तूच ना ती! मग आता लंगडण्यासाठी चुकीची जागा निवडलीस तू! आता कुठे पळशील!" नागीण फूत्कारत म्हणाली आणि पक्षिणीकडे सरपटू लागली. पाठलाग सुरू झाला. पक्षिणी पुढे, नागीण मागे.

नागीण खरबुजांच्या वाफ्यापासून दूर गेल्यावर रिकी-टिकीने लगेच तिथे धाव घेतली. तिथे नागाची एकदोन नाही, तर पंचवीस अंडी होती. त्यांच्या अर्धपारदर्शी आवरणातून आतली काळसर्पांची वेटोळी दिसत होती. वेळ न दवडता रिकी-टिकीने ती फोडून टाकायला सुरुवात केली. तीनच अंडी राहिली होती, तेव्हा त्याला पक्षिणीचा धावा ऐकू आला.

"धाव, रिकी-टिकी, धाव! नागीण घराच्या व्हरांड्यात शिरली आहे. तिथे जीव घेईल ती कोणाचा तरी. लवकर धाव!"

दोन अंडी फोडून टाकून आणि तिसरं अंड तोंडात धरून रिकी-टिकी धडपडत पण वाऱ्याच्या वेगानं तिथे पोचला. नागीण टेडीच्या खुर्चीजवळ वेटोळे घालून बसली होती. टेडीचे आईबाबा पांढऱ्या फटफटीत चेहऱ्यानं अगदी स्तब्ध बसले होते. "हलू नको, टेडी, हलू नको," बाबा सारखं म्हणत होते.



"जरादेखील पुढे आलात ना तुम्ही कोणी, तर हे पोर मेलंच म्हणून समजा!" नागिणीने त्यांना कोंडीत पकडलं होतं.

"आधी तिकडे भिंतीजवळ खरबुजांच्या वाफ्यात जाऊन तुझी अंडी बघ! आणि मग राहिलेल्या या शेवटच्या एकुलत्या एक अंड्याची किंमत काय, ते सांग!" तिथे आलेल्या रिकी-टिकीचं बोलणं ऐकल्यावर मात्र नागिणीने मागे वळून त्याच्याकडे पाहिलं. तेवढ्यात बाबांनी टेडीला आपल्याजवळ सुरक्षित ओढून घेतलं.

"फसली! फसली! चक्-चक्-चक्!" रिकी-टिकी चुकचुकला. "तुझ्या तावडीतून सोडवलं टेडीला! हो, आणि मीच धरलं होतं काल नागाला. मरेस्तोवर सोडलं नाही, ये, लढ आता माझ्याशी! घटका भरली आहे आता तुझी!!

नागिणीने स्वतःचं शरीर आकसून घेतलं, आणि स्प्रिंग सोडावी, तशी रिकी-टिकीच्या अंगावर जोरात झेप घेतली. पण रिकी-टिकी सावध होता. तिच्या चारी बाजूंनी, तिचे वार चुकवत तो विजेच्या वेगानं हलत होता. ती देखील तितक्याच वेगानं त्याच्या डोक्याचा वेध घेत होती. व्हरांड्यातील चटईवर तिच्या शेपटीचा वाळलेल्या पानांसारखा सर्र सर्र आवाज येत होता.

रिकी-टिकीचं त्या राहिलेल्या अंड्याकडे जरा दुर्लक्षच झालं, पण नागीण मात्र हळूहळू त्याच्याजवळ जात होती. एका क्षणी तिने ते तोंडात धरलं, आणि ती सुटलेल्या बाणासारखी, चाबकाच्या फटकाऱ्यासारखी आपल्या बिळाकडे सुसाट निघाली. तिला आता गाठलं नाही, तर पुन्हा पहिलीच स्थिती येणार, हे रिकी-टिकीला कळत होतं, तोही तिच्या मागे जिवाच्या करारावर धावला. शिंपी पक्षीण हे सारं पाहत होती. नागीण जवळ आल्यावर ती घरट्यातून खाली आली आणि नागिणीच्या डोक्यावर तिने पंख फडफडवले. एका क्षणासाठीच नागिणीने तिचं डोकं बाजूला घेतलं आणि ती पुन्हा निघाली. पण तो एक क्षण रिकी-टिकीला पुरेसा होता. नागिणीची शेपटी तोंडात घट्ट पकडून आणि बिळाच्या उतारावर आपले पाय रोवत तोही तिच्या मागे त्या अंधाऱ्या बिळात फरफटत गेला.

आता आत काय घडेल हे कोणी सांगावं! बाहेर शांतता पसरली. शिंपी पक्ष्याला दुःख आवरेना. त्याचं दुःखाचं गीत परमोच्च बिंदूला पोचलं, तेव्हा बिळाच्या तोंडाशी थोडी हालचाल झाली. मातीने अंग माखलेला रिकी-टिकी एकेक पाय ओढत बिळाबाहेर आला. "झाला शेवट सगळ्याचा! नागीण आता कधीच बिळाबाहेर येणार नाही."

स्वतःचा खूप अभिमान वाटावा, असं काम रिकी-टिकीने केलं होतं. पण त्याने गर्व बाळगला नाही. आपले दात, वेगवान उड्या, सतर्कता आणि चपळाई कायम ठेवून तो घराची आणि बागेची राखण करत राहिला, 'काय बिशाद, मृत्यूचा दूत म्हणून आलेला कोणी कपटी नाग तिथे परत पाऊल टाकेल!'

**-धनवंती हर्डीकर**
*dhanavanti@gmail.com*
*(शिक्षणतज्ज्ञ)*


*(कथेतील चित्रं इंटरनेटवरून साभार)*

# Hide & Seek

Illustrated by Mahimkar Sisters




Some objects are playing hide & seek beside, can you find them all?
Knife
Cauliflower
Bread
Book
Pizza
Duck
Tulip
Banana
Mushroom
Safety pin




# तयारी शुक्रावरच्या स्वारीची...

**दिसायला सुंदर पण प्रचंड तापमान असलेला शुक्र (Venus) नेमका कसा आहे, हे जाणून घेण्यासाठी तिथे आपलं यान पाठवलं जाणार आहे. या स्वारीची रंजक माहिती–**

**मित्रांनो,** 'शुक्र तारा मंद वारा...' हे गाणं तुम्हांला माहीत आहेच. गाणं फार सुंदर असलं, तरी कविराजांनी या गाण्यात शुक्राला तारा बनवून टाकलं आहे. याचं कारण बहुधा त्याच्या वेधक रूपात असावं. प्राचीन गीक संस्कृतीने तर शुक्राला प्रेम आणि सौंदर्यदेवतेचं प्रतीक मानलं होतं. परंतु आपल्याला माहीत आहेच, की शुक्र (Venus) हा तारा नसून तो आपल्या सौरमालेतील एक ग्रह आहे. दूरवरून अतिशय आकर्षक दिसणारा हा ग्रह प्रत्यक्षात मात्र अतिशय जहाल आहे. त्याच्यावरील तापमान प्रचंड, म्हणजे ५५० अंश सेल्शियसपेक्षा जास्त आहे. असा हा तप्त ग्रह माणसाला कायमच मोहीत करत आला आहे.

बुध (Mercury), शुक्र (Venus), पृथ्वी (Earth) आणि मंगळ (Mars) या आपल्या सूर्यमालेतील चार ग्रहांना 'अंतर्ग्रह' असं म्हटलं जातं, कारण या गटातील सगळे ग्रह एकमेकांच्या 'जवळ' आहेत. गुरू (Jupiter), शनी (Saturn), युरेनस, नेपच्यून आणि प्लुटो या बाह्यग्रहांपेक्षा जवळ आहेत.



पृथ्वीचा उपग्रह असलेला चंद्र आणि मंगळ यांच्यावर भारताने यशस्वी मोहिमा आखल्या. आता शुक्रावर स्वारी करण्याची तयारी सुरू आहे. सध्या सन २०२४चा डिसेंबर महिन्याचा मुहूर्त त्यासाठी ठरवला आहे. या मोहिमेला भारत सरकारकडून हिरवा सिग्नल मिळाला की ते नक्की होईल.

या मोहिमेचा उद्देश हा शुक्र या ग्रहाचा पृष्ठभाग नेमका आहे तरी कसा, पृष्ठभागावर आणि त्याखाली कोणत्या प्रक्रिया सुरू असतात, या ग्रहावरील वातावरणात कोणते रासायनिक घटक आहेत, शुक्रावरील वातावरणावर सूर्यावरील वादळांचा आणि सूर्याकडून होणाऱ्या रेडिएशनचा काय आणि कसा परिणाम होतो, शुक्र ग्रहाच्या वातावरणात सूक्ष्मजीव आहेत का, आदी गोष्टींचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यासाठी शुक्रावर पाठविण्यात येणाऱ्या यानावर जवळपास १०० किलो वजनाची विविध २३ उपकरणं बसविण्यात येणार आहेत. यापैकी १६ उपकरणं ही भारतीय, तर सात उपकरणं ही परदेशी असणार आहेत. शुक्रावर पाठविण्यात येणारे यान त्या ग्रहाभोवती चार वर्षं भ्रमण करत राहील. याच काळात त्या यानावरील उपकरणांच्या मदतीने त्या ग्रहांचा विविधांगांनी अभ्यास करण्यात येईल. या मोहिमेसाठी ५०० ते १००० कोटी रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे.

ज्याचा वेध घेण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात येणार आहे, तो शुक्र हा ग्रह आहे तरी कसा? तर शुक्राचा व्यास १२,१०० किमी आहे. त्याला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यासाठी २२४ दिवस लागतात. पृथ्वी पश्चिमेकडून पूर्वेकडे २४ तासांत एक परिवलन (स्वतःभोवतीची एक प्रदक्षिणा) पूर्ण करते, तर शुक्र हा ग्रह पूर्वेकडून पश्चिमेकडे परिवलन करतो आणि एक परिवलन पूर्ण करण्यासाठी त्याला २४३ दिवस लागतात. मात्र ही गोष्ट आपल्याला समजली, ती १९६५ सालामध्ये! १९६३ सालामध्ये 'ॲरिकिबो रेडिओ दुर्बीण' तयार करण्यात आली. या दुर्बिणीच्या मदतीमुळेच १९६५ सालामध्ये शुक्र आणि बुध या दोन ग्रहांना स्वतःभोवती प्रदक्षिणा घालण्यासाठी किती काळ लागतो, हे निश्चित करण्यात आलं!

शुक्रावर सूर्य पश्चिमेला उगवतो आणि पूर्वेला मावळतो. या ग्रहावरील वातावरण अतिशय दाट आहे. इतकं, की त्याच्या भूपृष्ठावर पृथ्वीच्या

तुलनेत १०० पट हवेचा दाब असतो. अतिशय दाट वातावरण असल्याने या ग्रहावर प्रकाशाच्या किरणांचं अतिअपवर्तन (hyper-refraction) होतं. या ग्रहावरच्या वातावरणात ९५ टक्के कार्बन डायऑक्साइड आहे. या ग्रहावर पाऊस पडतो, पण तो पाऊस सल्फ्युरिक ॲसिडचा असतो. मात्र पडणारा हा पाऊस या ग्रहाच्या भूपृष्ठापर्यंत पोचूच शकत नाही. या पावसाच्या थेंबांचं सल्फर डायऑक्साइडमध्ये रूपांतर होतं आणि त्या वायूचे कण या ग्रहाच्या वरच्या वातावरणात फेकले जातात.

शुक्र या ग्रहावरचा एक दिवस पृथ्वीवरच्या एका दिवसापेक्षाही खपूच मोठा असतो. याचं कारण या ग्रहाचा स्वतःभोवती फिरण्याचा वेग पृथ्वीपेक्षा खपूच कमी आहे. शुक्र या ग्रहाच्या पृष्ठभागावर लाव्हा खूपच मोठ्या प्रमाणावर पसरलेला आहे. त्याचं प्रमाण इतकं प्रचंड आहे की दूरवरच्या क्षितिजापर्यंत शुक्राचं भूपृष्ठ भगव्या आणि लाल रंगाने माखल्यासारखं दिसतं.

या ग्रहाची पहिली छायाचित्रं आपल्याला मिळाली, ती ३ नोव्हेंबर १९७३ रोजी पाठविण्यात आलेल्या मरीनर-१० या शोधयानामुळे. हे यान दि. ५ फेब्रुवारी १९७४ या दिवशी शुक्राजवळ पोचलं आणि त्यानं या ग्रहाची छायाचित्रं पृथ्वीवर पाठवली. यानंतर ४ मे १९८९ रोजी 'मॅगेलान' हे अवकाशयान 'ॲटिलान्टिस' या स्पेस शटलमधून शुक्राच्या दिशेने पाठविण्यात आलं. १० ऑगस्ट १९९० रोजी ते शुक्राच्या भोवती प्रदक्षिणा घालू लागलं. या यानाने पुढच्या आठ महिन्यांत शुक्राच्या ९० टक्के भूपृष्ठाचा नकाशा तयार केला. त्यावरून असं दिसून आलं की, या ग्रहाच्या भूपृष्ठाला असंख्य चिरा पडलेल्या आहेत. परस्परांना छेद देणाऱ्या या चिरांपैकी काहीतर हजारो किमी लांबीच्या आहेत.


**शुक्रावर लाव्हा खूपच मोठ्या प्रमाणावर आहे. शिवाय तिथे ज्वालामुखीचे पर्वत आहेत. त्यामुळे तो केशरी, लाल रंगाचा दिसतो.**

दुसरी एक गोष्ट दिसून आली की, शुक्राच्या भूपृष्ठावर प्रचंड वर्तुळाकृती चिन्हं आहेत. या चिन्हांना 'कोरोने' असं नाव देण्यात आलं आहे. त्यातील एक 'आर्टेमिस' या नावाचं एक चिन्ह तर खूपच मोठं आहे. मोठं म्हणजे किती? तर त्याचा व्यासच मुळी २४८० किमी आहे. त्या कोरोनेमध्ये ज्वालामुखीचे पर्वत असल्याचंही या यानाने पाठविलेल्या छायाचित्रांवरून स्पष्ट झालं.

सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे कालव्यासारखा भासणारा एक चर शुक्राच्या भूपृष्ठावर आहे. या चराला 'रिव्हर स्टिक्स' असं नाव देण्यात आलं आहे. या चराची रुंदी ८०० मीटर आहे, तर लांबी ७६८० किमी आहे! शुक्राच्या भूपृष्ठावर काही उंच पर्वतही आहेत, असंही आढळून आलं आहे.

आता नव्याने आखल्या जाणाऱ्या मोहिमेमध्ये यापैकी अनेक गोष्टींचा उलगडा होईल आणि काही गोष्टी नव्यानेसुद्धा आपल्याला समजतील. त्यामुळे 'शुक्र' या ग्रहाबद्दलच्या आपल्या माहितीत मोलाची भर पडेल. आपल्या सौरमालेतील आपला एक शेजारी आहे तरी कसा याचा उलगडा होईल. मात्र त्यासाठी आपल्याला बराच काळ थांबावं लागणार आहे.

२०२४ सालच्या डिसेंबर महिन्यात आपलं यान



काही कारणांनी पाठवता आलं नाही, तर आपल्याला २०३१ सालापर्यंत थांबावं लागेल. याचं कारण त्यावेळी शुक्र हा ग्रह २०२४-२५ प्रमाणे पृथ्वीच्या जवळ आलेला असेल आणि कमीत कमी इंधनाचा वापर करून आपल्याला त्या ग्रहावर मोहीम आखणं व्यवहार्य होईल. थोडक्यात, या सुंदर ग्रहाबद्दलच्या माहितीचा खजिना आपल्या हाती येण्यासाठी आपल्याला काही काळ थांबणं भाग आहे.


**-श्रीराम शिधये**
*shriramshidhaye@gmail.com*
*(ज्येष्ठ पत्रकार व विज्ञानलेखक)*

*(लेखातील फोटो 'नासा'च्या वेबसाइटवरून साभार)*

# अंकस्वस्तिक

**सूचना-** इथे या स्वस्तिकात दोन रंगीत चौकोनासहित सलग पाच चौकोनातील **अंकांची बेरीज (25)** आहे. यासाठी दिलेल्या चौकटीतील अंक वापरावेत.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 2 | 2 | 2 | 3 | 3 | 3 | 4 | 4 | 4 | 4 |
| 4 | 5 | 5 | 5 | 6 | 7 | 7 | 7 | 8 | 8 | 9 | 10 |




**-सुरेखा काणे**
*rekhakane@gmail.com*

*अंकस्वस्तिकचे उत्तर पान क्रमांक- ४९*




# Patience is Virtue

Fairy Tasha said to herself looking restlessly at the clock,

*"Tonight, I will turn eight,*
*Been such a long, long wait,*
*At twelve midnight, when clock rings,*
*I will get my new pair of wings..."*

She was so excited since morning! In some time now, when the clock strikes 12, it was going to be her eighth birthday!

In Fairyland, this was a huge landmark. On her eighth birthday, every fairy got a beautiful pair of wings. Tonight, it was Tasha's turn. Granny Fairy, Gremma, would come and gift them to her. And then, Tasha could fly over Fairyland with her other friends who already had them.

She remembered how her friends would gather around her and narrate so many wonderful things about Fairyland,

*"Ice-cream houses on snow-peaked mountains,*
*Orange and mint colas tumbling through fountains,*

*Chocolate laden trees so tall,*
*You need to come and see*
*them all……"*

Tasha was now eagerly waiting for Gremma to come over and give her that special birthday gift! Just a few days before her birthday, Gremma had visited her and asked,

*"My dear, you will be*
*eight years soon,*
*The wings will make*
*you reach for the moon.*
*Pray, tell me, how your*
*wings should be,*
*Studded with diamonds,*
*emerald or ruby."*
*Let me know the colours*
*of your choice,*
*Bright yellow, dark*
*red or brilliant turquoise.*
*For once I honour*
*your birthday's wish,*
*Those wings you*
*cannot relinquish……"*

But Tasha was sure of what she wanted,

*"Gremma, when I turn eight,*
*That feeling will be such great,*
*To fly in the skies and have fun,*
*And also help a needy someone.*
*I don't wish for any beautified stuff,*
*My wings just should be rough and tough……"*

Pleased with Tasha's thoughtful reply, Gremma had promised her to get one of the best pair of wings in Fairyland……

That evening, Tasha's home was bustling with her birthday preparations. Tasha's mother, Mirana, had baked a lovely cake for Tasha. She joyfully sang while decorating the cake,

*"What a delight to bake,*
*Tasha's eighth birthday cake.*
*Scrumptious Rose Red Velvet,*
*My Tasha's all-time favourite.*
*A frosting of silky cream cheese,*
*Decked with candies and toffees.*
*When Gremma gifts those*
*wings to her,*
*'Would be a cherry on*
*the cake for sure……"*

Tasha's friend fairies and elves were having a gala time dancing and singing. Some were playing the harp, some blowing horns. It was music all around. Tasha was very happy. When it was just a minute for the clock to strike 12, all her friends began saying the birthday countdown together…. 5… 4… 3… 2…1… and it was Twelve o'clock!!!

Tasha looked around for Gremma to appear. But she didn't. Tasha was on the verge of tears. All the singing and dancing stopped. Tasha knew that only those fairies got wings that had been good in their seventh year. All fairies had a magic ball in which

they could see their bad deeds of the last year. Dejected, Tasha rushed to her room. She took the magic ball in her hand and chanted,

*"Think to yourself,*
*please do recall,*
*Tell me my misdeeds,*
*O' magic ball!*
*About the passing year,*
*I just do not remember,*
*What were my fateful misdoings,*
*That I couldn't have the wings?......"*

The ball glowed for a moment and went off. Tasha tried asking the ball again but its answer was the same. Just then, Mirana came to her room. Tasha rushed into her arms and started sobbing. Mirana felt bad that Tasha was crying on her birthday but she consoled her and explained that if the magic ball doesn't show any happenings, that meant Tasha had been good all the year round. That cheered Tasha's mood a bit. Mirana pacified her,

*"Calm down,*
*O' dear fairy,*
*Why cry when all is merry?*
*Though, tonight Gremma is*
*quite late,*
*It's about your conduct*
*during this wait.*
*You are a big girl,*
*you got to grow,*
*Patience is virtue*
*you need to know..."*

Tasha understood what Mirana meant. She washed her face and came down to the party. Her friends, the fairies and elves were eagerly waiting for her. They sang



to Tasha her birthday song and cajoled her to cut the cake. Even Tasha didn't want to keep her guests waiting. As she was about to cut the cake, through the window, a carriage dashed inside the hall. Oh!

That was Gremma, after all! Seeing Gremma's royal carriage some elves and fairies chuckled,

*"The silver carriage flies across*
*the skies,*
*Studded with stars and meteorites,*
*Two sparkling white swans lead*
*the way,*
*Our Gremma arrives after*
*much delay..."*

Gremma heard them from a distance. Soon as she gave them a stern look, all was quiet around. Gremma went to Tasha and kissed her forehead,

*"I was caught in a storm on*
*my way here,*
*I am so sorry for being late dear.*
*Clouds encircled my carriage,*
*Lightning and thunder did*
*some damage.*
*The carriage needed a quick repair,*
*Oh! God, I was in such despair.*
*Had your wings gotten wet,*
*I'd so regret,*
*But thankfully, they're here,*
*just as perfect!......"*

Gremma then recited some verses. She swished her magic wand in the air a couple of times. Voila! Tasha was now a magnificent flying fairy with Misty Rose wings studded with delicate rubies. She flapped them to fly but fell. She stood up and again tried. After a couple more tries, she finally took off.

Her winged friends soared up and hovered around her. They tossed colourful sparkles on her head. Fairies on the ground burst balloons, elves played the harp, blew horns. It was merry all again. As her friends sang the birthday song, Tasha happily cut the beautiful cake.


After the party was over, Tasha took the blessings of Gremma and Mirana before she took off to fly over the Fairyland with her friends. Rains had stopped and the skies were clear. Tasha could now see the glittering stars, the silver clouds, and the moon from so near. She spotted the ice-cream houses and chocolate trees. She drank colas from the fountains before finally coming home weary from the excitement of her first flight.

Just then, Tasha saw Gremma's carriage flying across her window. She muttered,

*"I had been so silly,*
*To have cried needlessly,*
*I should grow up, I should evolve,*
*That's my eighth birthday's resolve.."*

And she blew a kiss which Gremma caught lovingly in her fist. Both of them, then smiled and together fluttered their elegant wings...

**-Prachi Mokashi**
*mokashiprachi@gmail.com*



'हॉबी हॉर्स' आणि 'बोनशेकर' या सायकली चालवताना

# दोन चाकांचा रंजक प्रवास

**'सायकल'** हा सगळ्यांचा लाडका आणि अत्यंत उपयुक्त वाहन प्रकार! दोन-तीन वर्षांच्या मुलापासून ते वयस्क लोकांपर्यत सगळे सायकल चालवू शकतात. ना लायसन्सची (वाहन परवाना) गरज, ना महागड्या पेट्रोल, डिझेल, गॅसची गरज! या वाहनामुळे व्यायाम होतोच; शिवाय पार्किंगची जागादेखील फार जात नाही. शिवाय किंमतही वाजवी असते.

लाकडाची सायकल, बिना पेडलची सायकल, मग चक्क चार फूट उंच चाकावर बसवलेले पेडल असलेली सायकल ते आताची मॉडर्न सायकल असा सायकलचा दोन चाकी प्रवास मनोरंजक आहे.

१८१७-१८ मध्ये पहिल्यांदा जर्मनीच्या कार्ल ड्रिस याने सायकल तयार करून पाहिली. पण त्या सायकलला पेडलच नव्हतं! काहीतरी भन्नाट करायचं म्हणून खरं तर एका भल्या मोठ्या चाकाची सायकल त्याने तयार केली. हिला पेडल नसल्याने पायानेच ओढत, धावत धावत तिला चालवायला लागायचं. लोकांना सुरुवातीला धमाल वाटली. कार्लच्या आधी कुणीतरी लाकडाची सायकल तयार करण्याचादेखील प्रयत्न केला होता म्हणे! कार्लने

**सायकलचा प्रसार जगभरात व्हावा म्हणून United Nations तर्फे ३ जून हा दिवस World Bicycle Day म्हणून साजरा केला जातो. मजा, स्वातंत्र्य, आर्थिक समता, पर्यावरणपूरकता, आरोग्य यांचं प्रतीक म्हणजे दोन चाकी सायकल!**


तयार केलेली सायकल बऱ्याच जणांनी हौसेनं चालवली. परंतु कार्ल ड्रिसला ७ किमी अंतर पार करायला एक तास लागला होता! हा वेळ बघून त्या सायकलवर 'हॉबी हॉर्स' असा शिक्का बसला!

### सायकल की बोनशेकर ?

कार्लच्या सायकल प्रयोगाने काही संशोधक मात्र या वाहनाकडे आकर्षित झाले. काही फ्रेंच संशोधकांनी यात डोकं खुपसलं आणि १८६०-७० साली एक भलं मोठं चाक आणि एक छोटं चाक, मोठ्या चाकाला पेडल अशी खऱ्या अर्थानं 'बायसिकल' तयार झाली. हाडं खिळखिळी करणारी याची रचना आणि चार फुटांच्या वर बसून चालवताना होणारा थरकाप लक्षात घेऊन याला 'बोनशेकर' हेच नाव पडलं. याच्या साहसी स्पर्धा देखील घेतल्या जाऊ लागल्या. काही धडपड्या इंग्लिश संशोधकांनी या सायकलमध्ये आणखी सुधारणा केल्या. जेम्स स्टरले याच्या मॉडेलला बरीच लोकप्रियता मिळाली. त्यानंतर काही 'बायसिकल क्लब' पण निघाले. थॉमस स्टीव्हन याने तर ही सायकल घेऊन जगप्रवास करण्याचा प्रयत्न केला.

### खरी 'बायसिकल'!

साहसी सायकलींची लोकप्रियता हळूहळू वाढत गेली. मग ही दुचाकी 'वाहन' म्हणून वापर करता येईल का, याचा विचार काही सायकलप्रेमी करू लागले. त्या काळात घोड्यांचा वापर अधिक होत



*४ फूट उंच बायसिकल*

असे. घोड्याची जागा सायकल घेऊ शकेल का, हा विचार तेव्हा क्रांतिकारी होता.

आणि मग १८८५च्या आसपास जेम्स स्टरले याच्या भाच्याने सुरक्षित अशी सायकल तयार केली. दोन्ही चाकं सारख्या आकाराची, कमी उंचीची, चांगली चेन आणि पेडल असलेली ही सायकल तीच आहे, जी आज जगभर वापरली जाते. त्यात कालांतराने काही बदल होत गेले. गीअरची सायकल, माऊंटन सायकल, स्टंट सायकल, इलेक्ट्रिक सायकल, फोल्डिंग सायकल असे अनेक प्रकार आता आलेत.



## रंजक नोंदी!

◆ सायकल चालवणारे लोक हे जगभरात 'कूल डूड्स' म्हणून प्रसिद्ध आहेत. ते हसत-खेळत जगणारे आणि कोणत्याही कठीण परिस्थितीचा सामना करू शकणारे असतात, असं मानलं जातं.

◆ सायकल हे गरिबांना परवडणारं आणि श्रीमंतांनाही आवडणारं वाहन आहे, जे प्रदूषण करत नाही आणि आरोग्य चांगलं राखतं.

◆ सॅनतोस आणि साऊथ ऑस्ट्रेलिया युनिव्हर्सिटीने २०१५ साली १३५ फूट लांबीची अवाढव्य सायकल तयार केली होती.

◆ जर्मनीच्या दीदीने १० फूट ९ इंच व्यासाच्या (डायमिटर) चाकाची सायकल तयार केली आणि ती चालवून पण दाखवली!

◆ सायकल ही जगभरातल्या चित्रपटांचादेखील आवडीचा विषय आहे. 'फास्टर फेणे' ते 'छोटा भीम' सगळ्यांचं सायकल हे लाडकं वाहन आहे!


कूल डूड्स

◆ बायसिकल थीफ, एलिझाबेथ एकादशी असे अनेक चित्रपट आहेत, ज्यात 'सायकल' मध्यवर्ती आहे. आणखी कोणकोणत्या सिनेमांत सायकलचा वापर केलाय, याची यादी कराल?

◆ जगात कोपनहेगन, बर्लिन, टोकियो अशी अनेक 'सायकलची शहरे' म्हणून प्रसिद्ध आहेत. इथे रोज सायकलनेच ऑफिसला जा-ये करणारे बहुसंख्य लोक आहेत आणि त्यांच्यासाठी वेगळे सायकल ट्रॅक्स किंवा रस्ते आहेत. एका वेळी १२-१३ हजार सायकली मावतील इतके भव्य पार्किंग झोन तयार केले आहेत. भूतानसारख्या डोंगराळ देशात सायकलने जा-ये करणाऱ्याला विशेष मान देण्यात येतो.

◆ जगातील सगळ्यात कठीण ट्रान्स सैबेरीयन सायकल स्पर्धा पूर्ण करून जागतिक क्रमवारीत चौथ्या नंबरवर आलेला आणि आशियातील एकमेव सायकलपटू म्हणून नागपूरचा डॉ. अमित समर्थ याची विक्रमी नोंद आहे.

◆ आतापर्यंत भारतात 'पुणे' हे सायकलचे शहर म्हणून ओळखले जायचे, आता त्यात लुधियानाची भर पडली आहे. भारतातील अनेक शहरांत व गावांतही सायकल लोकप्रिय आहेच.

**–सोनाली कोलारकर-सोनार**
*sonalisk73@gmail.com*
(ज्येष्ठ पत्रकार)



जगातील सगळ्यात लांब सायकल




आशियातील विक्रमी सायकलपटू डॉ. अमित समर्थ



गिनीज बुकमध्ये नोंद- मोठ्या चाकाची सायकल

निसर्ग नवल

**आपण जसे शाळेत न बोलता विविध प्रकारे आवाज काढण्याचे किडे करतो ना, तसेच प्रकार निसर्गातले किडेही करतात! वेगवेगळे आवाज करणारे अनेक कीटक गळ्यातून गात नाहीत. ते स्वत:चे अवयव एकमेकांवर घासून किंवा कवच हलवून आवाज करतात...**



# मुका नाही, तरी आवाज आगळा.

**निसर्गातील** प्राण्यांची-पक्ष्यांची दुनिया जशी रंग-रूपाने सजलेली आहे, तशीच वेगवेगळ्या आवाजांनी नटलेली आहे. अगदी मोरांच्या केकांपासून ते वाघोबाच्या डरकाळीपर्यंत सगळ्या अरण्याला जिवंतपणा देण्याचे काम हे आवाज करतात. निसर्गातल्या मोठ्या पशू-पक्ष्यांना जशी आवाजाची देणगी लाभलेली आहे तशीच ती काही छोट्या जीवांनाही लाभलेली आहे. त्यांचे आवाजही आपण काही वेळा ऐकतो; मात्र या आवाजातले वेगळेपण माहीत नसल्याने त्यातली गंमत पटकन लक्षात येत नाही.

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये रानातल्या वाटांवरून चालताना किंवा शेता-माळावरूनही ‘बझझझ... किर्रर .. बझझ ’ असा काहीसा तो आवाज असतो. अचानक सुरू झालेला हा आवाज हळूहळू वाढत जातो, वेगवेगळ्या दिशांमधून जणू त्याला कोरसची साथ मिळते आणि खटका दाबावा तसा अचानक तो बंदही होतो. या

आवाजाचा कलाकार आहे 'सिकाडा' हा कीटक. रातकिड्याचा हा दिवसाचा अवतार म्हणा ना! त्यामुळे याला 'दिनकिडा' म्हणायला हरकत नाही.

भारतामध्ये सिकाडांचे सुमारे २५० प्रकार नोंदवण्यात आले आहेत. सिकाडा हे कीटक असल्याने त्यांच्या तोंडाची, घशाची रचना सस्तन प्राणी किंवा पक्ष्यांसारखी नसते. त्यामुळे त्यांना स्वरयंत्र नसते. साहजिकच प्राणी वा पक्ष्यांप्रमाणे ते गळ्यातून, तोंडातून आवाज काढू शकत नाहीत.

**रानातून किंवा घराजवळच्या झाडीतून फिरताना अनेकदा बझझझ... किर्रर .. बझझ असा आवाज ऐकला असेल तुम्ही... ही सिकाडाची सिंफनी असू शकते. वेगवेगळ्या जातीचे सिकाडा वेगवेगळा आवाज काढतात.**

मात्र निसर्गाने त्यांना आवाज काढण्याची एक वेगळीच यंत्रणा दिली आहे. सिकाडामधील नरांच्या पोटावर आणि छातीच्या जवळ 'टिम्बल' असते. हा अवयव एखाद्या पातळ पण कडक पडद्यासारखा असतो. सिकाडाच्या बाह्य कवचाचाच तो भाग असतो. या टिम्बलच्या मदतीनेच नर सिकाडा आपला आवाज काढतो. नर सिकाडा आपल्या फुप्फुसात हवा भरून घेतो आणि ती जोराने बाहेर फेकताना या 'टिम्बल'च्या साहाय्याने आवाजाची पट्टी वर खाली करतो. नर सिकाडा हे गाणे मादीला आकर्षित करण्यासाठी गात असतो, पण अनेक प्रजातींमधल्या माद्या मात्र असा ( म्हणजे आवाजी !) प्रतिसाद देऊ शकत नाहीत, त्या फक्त आवाजाच्या रोखाने नराला शोधत येतात. सिकाडा नरांचा हा आवाज अगदी अर्ध्या किलोमीटर अंतरापर्यंत सहज ऐकू जातो. एका नराने आवाज करायला सुरुवात केली की, त्या परिसरातले बाकीचे नरही आपले अस्तित्व दाखवण्यासाठी आवाज करू लागतात आणि रानभर सिकाडाचीच सिंफनी ऐकू येते. सिकाडांमध्ये प्रजातीनुसार आवाज बदलताना जाणवतो. ऑस्ट्रेलियात सापडणारा एक सिकाडा तर असा हवेच्या मदतीने आवाज न करता, त्याऐवजी कंपने (Vibrations) निर्माण करून ज्या झाडावर तो बसलेला असतो त्याच्या खोडामधून ती कंपने पुढे पाठवतो. त्याची मादीही याच प्रकारे कंपनांमधून संवाद साधते.

सिकाडा हवेच्या मदतीने आवाज करतात, तर त्यांचे भाऊबंद म्हणावेत (आवाजाच्या बाबतीत) असे क्रिकेट म्हणजे रातकिडे तर हवेची मदत न घेता आपल्याच शरीरातून आवाज निर्माण करतात. क्रिकेट अर्थात रातकिडे हे टोळ, नाकतोडे यांच्या कुटुंबातले आहेत. क्रिकेटना त्यांच्या पुढच्या पंखावर आवाज निर्माण करण्यासाठी खास अवयवच दिलेला असतो. पंखाचाचा विस्तार असलेल्या या भागाला कंगव्यासारखे दाते असतात आणि आवाज निर्माण करताना क्रिकेट हे दाते एकमेकांवर घासतो आणि त्यातूनच त्याची 'किर किर' सुरू होते. सिकाडाच्या मादीप्रमाणेच क्रिकेटच्या माद्यांनाही





आवाज करण्याचा हा अवयव नसतो. त्यामुळे त्या काही बोलतच नाहीत.

आपल्याला रात्री सतत, जराही खंड न पडता ऐकू येणारी रातकिड्याची किरकिर एकसुरी वाटली तरी त्यातही वैविध्य असते. म्हणजे नर जेव्हा मादीला आकर्षित करण्यासाठी, आमंत्रण देण्यासाठी आवाज करतो तो वेगळा असतो, नंतर जेव्हा मादी जवळ येते तेव्हा नर वेगळा आवाज काढतो.

ग्रासहॉपर्स म्हणजे नाकतोडे हे देखील क्रिकेटप्रमाणेच 'स्ट्रायड्युलेशन' करून म्हणजे स्वतःचे अवयव एकमेकांवर घासून आवाज करतात. त्यासाठी ते आपल्या मागच्या पायावरील खुंटांसारख्या भागांचा वापर करतात. हा भाग ते आपल्या पंखांच्या कडक कडेवर घासतात आणि ध्वनी निर्माण करतात. नाकतोड्यांमध्ये माद्याही असा आवाज निर्माण करू शकतात; मात्र नरांच्या तुलनेने माद्यांनी काढलेला आवाज अगदी लहानसा असतो.

नाकतोड्यांच्या 'गाण्या'लाही वेगवेगळे अर्थ असतात. एकमेकांना अन्न कुठे मिळेल हे सांगायला जसे ते आवाज काढतात, तसेच माद्यांना आकर्षित करायलाही काढतात.

स्ट्रायड्युलेशन करून आवाज काढणाऱ्या कीटकांच्या यादीत पतंग म्हणजे मॉथचा समावेश होतो. माद्यांना आकर्षित करायला काही जातीच्या पतंगांचे नर आपल्या पंखांवरचे विशिष्ट खवले आपल्या छातीवर घासून फक्त माद्यांनाच ऐकू जाईल असा ध्वनी काढतात; तर काही जातींचे मॉथ त्यांच्या शिकाऱ्याला म्हणजे कीटक खाणाऱ्या वटवाघळांना चकवण्यासाठी असे आवाज काढून, वटवाघळांची फ्रिक्वेन्सी जॅम करून टाकतात. मात्र पतंगाचे हे सगळे आवाज 'अल्ट्रा साउंड' प्रकारचे असल्याने माणसांना साध्या कानांनी ऐकता येत नाहीत.

एकूण काय निसर्गामध्ये गळयाविना आवाज करणाऱ्यांची कमी नाही.

**–मकरंद जोशी**
*makarandvj@gmail.com*
*(निसर्ग अभ्यासक व लेखक)*

*(लेखातील फोटो युवराज गुर्जर)*

# चपखल

## ऱ्हस्व-दीर्घ लेखन (अ)

इथे आपण ऱ्हस्व-दीर्घांच्या काही सोप्या नियमांचा विचार करणार आहोत.

नियम- शब्दाच्या शेवटी इ किंवा उ आला तर तो दीर्घ लिहावा.

जसे नदी, अंकलिपी, जादू, सुरू.

पण एक गोष्ट लक्षात ठेवा, या नियमाला काही अपवाद आहेत. हे अपवाद असलेले शब्द आहेत- आणि, परंतु, अद्यापि, तथापि, यथामति, किंतु, इति. अति, यथाशक्ति, कदापि, यद्यपि, बहु.

मग पुढील शब्दांमध्ये चूक असेल तर ती दुरुस्त करा बरं. लक्षपूर्वक पाहा. काही शब्द बरोबरच दिलेले असतील तर काहींचा या नियमाशी काही संबंध नसेल, ते तुम्हांला चकविण्यासाठी दिले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | अकालि | |
| २ | कीर्ति | |
| ३ | उपस्थिती | |
| ४ | बाइ | |
| ५ | आरोपि | |
| ६ | इंग्रजि | |
| ७ | अति | |
| ८ | झुंजूमुंजु | |
| ९ | पेरु | |
| १० | परंतु | |
| ११ | कवि | |
| १२ | मउ | |
| १३ | ऊदबत्ति | |
| १४ | गरिबी | |
| १५ | कपटि | |
| १६ | जुडि | |
| १७ | कष्टाळू | |
| १८ | धरति | |
| १९ | पिल्लु | |
| २० | चेंडू | |

-प्रतिभा गोपुजकर | *(ज्येष्ठ लेखिका)*
*gopujkars@hotmail.com*

*चपखलची उत्तरं पान क्रमांक- ४९वर*




# मंदार भारदे

पंढरपूरच्या वारीवरची डॉक्युमेंटरी करताना, दिवे घाटातून वारी जातानाचा शॉट घेण्यासाठी हेलिकॉप्टर मिळालं नाही म्हणून चक्क स्वत:ची विमान कंपनी काढण्याचा विचार करणारा जिद्दी मंदार भारदे आज अनेक बड्या मंडळींना विमानं भाड्याने देणाऱ्या कंपनीचा मालक आहे; शिवाय लेखक, वक्ता म्हणूनही त्यांनी स्वत:ची ओळख निर्माण केली आहे.

..मंदार भारदे यांचं किशोरवय कसं होतं ते त्यांच्याकडूनच जाणून घेऊ या.



**मी** मूळचा नाशिकचा. माझ्या पाचवी ते दहावीच्या काळात वडिलांच्या बदलीमुळे दोन शहरं आणि तीन शाळा बदलल्या! पाचवी-सहावीत असताना मी सिन्नरला होतो. नंतर नाशिकमध्ये आलो. शाळा, शहरं आणि घरं बदलावी लागली, त्याचा खूप फायदा झाला. वेगवेगळे शिक्षक, वेगवेगळे मित्र मिळाले. शाळेत असताना मी वक्तृत्व-स्पर्धांमध्ये आणि नाट्य-स्पर्धांमध्ये भाग घ्यायचो, बक्षिसं मिळवायचो. हे सगळं करायला घरातून खूप प्रोत्साहन मिळायचं. आमच्या घरी भरपूर पुस्तकं आणि मासिकं असायची. रोज आवर्जून बातम्या बघितल्या जायच्या. प्रत्येक शाळेत या अशा स्पर्धांमधून भाग घेणारे, शाळेचं प्रतिनिधित्व करणारे 'सेट' झालेले संघ असतात. अशा वेळी प्रत्येक नव्या शाळेत मलाही संधी मिळण्यासाठी नव्याने सुरुवात करावी लागायची. त्या शाळेतल्या शिक्षकांशी ओळख करून घेणं, मला स्पर्धेत भाग घ्यायचाय हे त्यांना पटवून देणं, शाळेच्या संघात


शिरकाव करणं हे सगळं मी आवर्जून करायचो. कारण एकदा आपण संकोच किंवा भीड पडून मागे राहायला लागलो की मागेच राहतो. आपले हे गुण दडून राहतात.

शिवाय वसाहतीतल्या गणपती मंडळांत कार्यक्रमांचं आयोजन करण्यात माझा सक्रिय सहभाग असायचा. या मुशाफिरीमुळे अनुभव तर खूप मिळालाच, शिवाय मी एकदम निर्भीड झालो.

एखादी गोष्ट करायची तर 'हे आपल्याला जमेल का?', 'आपल्या ओळखीचं इथे कुणी नाहीये..' असे विचार कधीच मनात आले नाहीत.

किशोरवयात मी माझ्या आवडीच्या अनेक गोष्टी केल्या. वर्तमानपत्राच्या ऑफिसमध्ये जाऊन शालेय मुलांसाठी पुरवण्या चालवणाऱ्या पत्रकारांशी ओळख करून घेतली. शाळेतल्या कार्यक्रमांचं रिपोर्टींग केलं. पोलिसांकडे जे 'डॉग स्क्वॉड' असतं, त्याचं मला तेव्हा खूप आकर्षण होतं. कुत्र्यांना ट्रेनिंग कसं देतात वगैरे गोष्टींविषयी खूप कुतूहल होतं. मग मी डेप्युटी कमिशनरांना भेटून त्याबद्दल विचारलं. त्यांनी मला डॉग स्क्वॉड कसं काम करतं, कुत्र्यांचं प्रशिक्षण कसं होतं वगैरे सगळं दाखवलं. मग मी त्या विषयी लिहिलं, ते वर्तमानपत्रात छापून आलं. मलाही वाटलं की, आपणही कुत्रे पाळून, त्यांना ट्रेनिंग देऊन विकूया. मग मी त्यासाठी रस्त्यावरचे कुत्रे पकडून आणले, माझा हा प्रयत्न पार फसला! पण त्या निमित्ताने मला व्यवसाय करायचा असेल तर काय काय करावं लागतं ते मात्र अगदी व्यवस्थित कळलं!

महापालिकेचा 'पाणी शुद्धीकरण प्रकल्प' कसा काम करतो, या विषयी मला उत्सुकता होती. तो पाहायची संधीही अशीच मिळवली. नाशिकमध्ये आकाशवाणीच्या नव्या स्टुडिओची सुरुवात झाली तेव्हा मी सातवीत होतो. मी तिथे जाऊन स्टेशन डायरेक्टरना भेटलो आणि त्यांच्या बरोबर संपूर्ण



*जिजाई थिएटर्स येथे झालेल्या बालनाट्य शिबिरात गिरीश ओक यांच्यासमवेत किशोरवयातील मंदार भारदे*

आकाशवाणी केंद्र फिरून बघून आलो. मग दोन-तीन दिवसांनी माझ्या काही मित्रांनाही तिथे घेऊन गेलो. तिथला तो नवा कोरा वास, नवेपणा आणि एसी हे अजूनही मला आठवतं! तेव्हा एसी कुणाच्याही घरातबिरात फारसे नसायचे. त्यामुळे तो वास व अनुभव आजही लक्षात आहे. एकदा रेल्वेची सिग्नल रूम पाहायलाही गेलो होतो.

नाशिकला उत्तम नाट्यगृहं आहेत. मी अधूनमधून तिथे जायचो, ग्रीन रूममध्ये जाऊन कलाकारांना भेटायचो, विंगेतून नाटक पाहायचो. दहावीत असताना मी पहिल्यांदा रत्नाकर मतकरी यांनी लिहिलेल्या एका बालनाट्याचा प्रयोग आयोजित केला होता. चांगली तिकीटविक्री होऊन आम्हांला खूप फायदा मिळवून देणारा ठरला तो प्रयोग!

आमच्या नाशिकचे भूषण म्हणजे सुप्रसिद्ध साहित्यिक वि. वा. शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रज! मी सातवीत असताना एका नाट्यवाचन-स्पर्धेत त्यांच्या 'नटसम्राट'मधल्या 'आप्पासाहेब बेलवलकरां'च्या भूमिकेचं वाचन



केलं होतं. त्यात मला पहिलं बक्षीस मिळालं, तेव्हा तात्यासाहेब 'एकदा घरी ये..' म्हणाले. मी लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी त्यांना भेटायला गेलो. त्यांचा ज्ञानपीठ पुरस्कार हातात घेऊन पाहिला!

या अशा सगळ्या गोष्टी आपण किशोरवयात करू शकतो. त्या वयातल्या आपल्या उत्सुकतेचं कौतुक वाटून मोठी माणसं आपल्याला संधी देतात. त्यामुळे मला वाटतं की किशोरवयातल्या मुलांनी ठरवून आठवड्याला एका तरी आपल्या परिघाबाहेरच्या ठिकाणाला भेट द्यायला हवी. अशा वेगवगेळ्या ठिकाणी जाणं, लोकांना भेटणं हे नक्कीच करावं, त्यातून अनेक अनुभव मिळत जातात.

मी हे सगळं करू शकलो कारण घरातलं मोकळं वातावरण! घरी आई, बाबा, धाकटी बहीण आणि अधूनमधून माझा मामे भाऊ असे आम्ही होतो. माझ्या आई-बाबांनी माझी कधीच कुणाशी तुलना केली नाही आणि माझ्या प्रत्येक गोष्टीला नेहमी प्रोत्साहनच दिलं. बरेच पालक आपल्या मुलांना कशात अपयश आलं तर पुन्हा पुन्हा त्याविषयीच सांगून त्यांचा सगळा उत्साह मारून टाकतात. माझ्या आई-बाबांनी मात्र माझ्या उत्साहाला खतपाणी दिलं. अमूक एक गोष्ट आपल्याला जमणार नाही असं मला वाटलंच नाही कधी! मला बक्षीस घेऊन घरी जातानाही आनंद वाटायचा आणि बक्षीस नाही मिळालं, एखादी गोष्ट नाही जमली तरी त्याचंही कधी काही वाटलं नाही. मी अभ्यासात चांगला होतो. सहावी-सातवीत असेपर्यंत वर्गात पहिला यायचो, पण नंतर मात्र कधीच पहिला आलो नाही. आमच्या शाळेत उत्तम मार्क मिळालेल्या मुलांची जी तुकडी होती, त्या तुकडीत मी कायम होतो, पण पहिल्या तीनमध्ये वगैरे नसायचो.

किशोरवयात मी दिवसाला १०० पानं तरी वाचायचो. हाताला लागतील ती पुस्तकं, मासिकं वाचून काढायचो. पुस्तक चुकीच्या पद्धतीने धरून वाचल्यामुळे मला तेव्हा चष्माही लागला! एकदा तर गंमतच झाली. मी लायब्ररीत वाचत बसलो होतो. पुस्तक घेऊन मागे कुठेतरी जाऊन बसलो होतो, त्यामुळे तिथल्या स्टाफला मी दिसलोच नाही. ते लायब्ररी बंद करून निघून गेले. मी तिथेच चार-पाच तास अडकून पडलो. पण खरं सांगायचं तर मी अजिबात घाबरलो नाही. उलट मी निवांत वाचत बसलो. शाळेची लायब्ररी, कुणाची व्यक्तिगत लायब्ररी असं मिळेल तिथून मी वाचायचो. सुरुवातीला काल्पनिक साहित्य वाचायचो. पण नंतर वैचारिक साहित्य वाचायची सवय लावून घेतली. कितीही काल्पनिक साहित्य वाचलं तरी वैचारिक साहित्याची २० पानं तरी वाचायचीच अशी शिस्तच स्वतःला लावली. सुरुवातीला प्रामुख्याने मराठी वाचायचो. मग कॉलेजला गेल्यावर मात्र ठरवून प्रयत्नपूर्वक इंग्लिश वाचायला लागलो. अवांतर वाचनाची सवय शिस्तीत लावून घ्यावी लागते आणि त्याचा नक्कीच खूप फायदा होतो.

माझे आजोबा म्हणजे माझ्या बाबांचे काका बाळासाहेब भारदे हे गांधी विचारसरणीचे होते. ते महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष होते, राजकारणी होते. अध्यात्म, कीर्तन, प्रवचन, समाज प्रबोधन हे सगळं ते करायचे. त्यांचा प्रभाव आमच्या घरावर होता. पण मला वाटतं की एखाद्याने इतर कुणासारखंही बनू नये, त्याने स्वतःसारखं व्हायला हवं. माझी मुलं आता दहावी आणि आठवीत आहेत. त्यांनाही मी हेच सांगतो की, माझ्या अपेक्षांचा तुमच्या स्वप्नांशी काही संबंध नाही! त्यांनी त्यांच्या डोळ्यांनी त्यांची स्वप्नं बघावीत.

एक गोष्ट मात्र किशोरवयात असताना करायची राहून गेली, ती म्हणजे खेळ आणि शारीरिक तंदुरुस्तीसाठी प्रयत्न करणं. पुढे मोठेपणी जाणीवपूर्वक, खूप मेहनतीने शारीरिक तंदुरुस्तीसाठी प्रयत्न केले. पण आत्ता किशोरवयात असणारी जी मुलं हे वाचतायत त्यांना मात्र मी आवर्जून सांगेन की मोकळ्या जागी भरपूर खेळा! शारीरिक तंदुरुस्तीसाठी या वयातच मेहनत करा. बिनधास्तपणा, निर्भीडपणा, प्रचंड कुतूहल, नव्या गोष्टींची उत्सुकता, भरपूर वाचन आणि या सगळ्याला प्रोत्साहन देणारं घरचं वातावरण या सगळ्यामुळे माझं किशोरवय समृद्ध झालं.

Aviation क्षेत्राची काहीही पार्श्वभूमी नसताना मला वाटलं की आपण विमाने, हेलिकॉप्टर भाड्याने देणारी कंपनी उभारावी. आज मी 'MAB Aviation'चा मॅनेजिंग डायरेक्टर आहे.

माध्यम क्षेत्रात वावरतो. लेख लिहितो. या सगळ्याची मुळं माझ्या या किशोरवयातल्या मुशाफिरीत आहेत!

**-शब्दांकन : अंजली कुलकर्णी-शेवडे**

*anjalicoolkarni@gmail.com*

(प्रसिद्ध निवेदिका)

विज्ञान-कविता

# रिमझिम

गर्मीने पाण्याची वाफ झाली,
हलकी होऊन वर निघाली.
धुळ-कण सोबत घेऊन मग,
पुंजक्या पुंजक्यांचे बनले ढग.

आकाशात ढग खेळायला आले,
धावून, धावून मळून गेले.
वाऱ्याने केली ढकलाढकली,
उंच डोंगरांनी वाट अडवली.

विजेने केला चमचमाट,
ढगांनी केला गडगडाट
पावसाची रिमझिम पाहून,
मुलांनी केला किलबिलाट.

**-अपर्णा**

*swara.mokashi@gmail.com*

## SOLVE THIS ?

**$3+3\times3-3+3 =$** ☐

A) 18 B) 12 C) 06 D) 03

# शेपटीवाले रुग्ण



**पशुचिकित्सक** (Vet) म्हणून माझ्याकडे मुख्यतः पाळीव प्राणी येतात. म्हणजे कुत्रे, मांजरी, कासवं, ससे, गिनी पिग्स आणि पक्षी. प्रत्येक प्राण्याचा आजार वेगळा आणि ते व्यक्त करायची पद्धतही वेगळी. मी तुम्हांला अधूनमधून अशाच काही आजारी प्राण्यांच्या गोष्टी सांगणार आहे.

क्लिनिकमध्ये 'कॅस्पर' आला होता. कॅस्पर हा एक बोका आहे. दोन दिवसांपासून त्याने काही खाल्ले, प्यायले नाही, म्हणून काळजी वाटून त्याचे काका त्याला दाखवायला घेऊन आले. मी तपासलं, त्याच्या पोटात तर दुखत नव्हतं, ताप नाही, सर्दी नाही... पण तोंडाला हात लावला आणि कॅस्पर ओरडला. त्याला तोंडात दुखत होतं.

तो तोंड उघडून बघायला देईना. मग जरा त्याचे लाड केले. त्याला नीट पकडलं आणि त्याचं तोंड उघडून बघितलं, तर तोंडात माशाचा काटा अडकला होता. तो काटा त्याच्या हिरडीला सतत बोचत होता. बिचारा कॅस्पर! तो हाताने काटा काढायचा प्रयत्न करत होता, पण त्याच्याकडून तो काही निघत नव्हता. तो प्रत्येक वेळी तोंड बंद करत असेल तेव्हा काटा अजून थोडा रुतत असेल आणि त्यामुळे हिरडीला जखम झाली होती.

मग आम्ही तो काटा काढला, त्याच्या जखमेला औषध लावलं, त्याचं दुखणं कमी व्हावं म्हणून इंजेक्शन दिलं. त्यानंतर कॅस्पर निवांत झाला.. परत खाऊ पिऊ लागला!

मुक्या प्राण्यांचं आजारपण निभावताना प्रत्येक बारीकसारीक शक्यता आजमावून बघावी लागते.

**-डॉ. मंजिरी बेलसरे**
*manjiribelsare@gmail.com*







▸ शिक्षक- गण्या, मला 'चालढकल' या शब्दाचा अर्थ सांग.
गण्या- सर... उद्या सांगितला तर चालेल का?

### अंकस्वस्तिकचे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | 6 | 5 | 9 | 4 | 1 |
| 7 | | | | 2 | | | | |
| 8 | | | | 3 | | | | |
| 5 | | | | 4 | | | | |
| 4 | 8 | 2 | 1 | 10 | 1 | 4 | 2 | 8 |
| | | | | 5 | | | | 6 |
| | | | | 3 | | | | 3 |
| | | | | 4 | | | | 7 |
| 1 | 7 | 10 | 4 | 3 | | | | 1 |

*अंकांची बेरीज (25) आहे.*

### चपखलची उत्तरं

अहम् आवाम्
वयम्
कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
'वयम्' न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७० इमेल : info@wayam.in वेबसाइट : www.wayam.in

**वाचकांमध्ये 'वयम्'ची लोकप्रियता वाढत आहे. 'वयम्'चे सभासदत्व घेण्यास उत्सुक असलेल्यांच्या सोयीसाठी आमच्या प्रतिनिधींची ही यादी. हे 'वयम्' प्रतिनिधी म्हणजे 'वयम्'चा प्रसार प्रेमाने करणारे दूत आहेत.**

# 'वयम्' प्रतिनिधी

**पुणे (चिंचरी-पिंपवड)**
सुप्रिया पुराणिक
7030360758

**गोरेगाव-मुंबई**
अनघा अनिल चंद्रात्रे
8080550353

**पालघर**
मनोविकास ग्रंथोत्सव
9967081527

**गिरगाव-मुंबई**
मेसर्स बी.डी.बागवे एजन्सी
7506000869

**वरळी-मुंबई**
संजना चव्हाण
9221969336

**डोंबिवली**
सुनिल पांचाळ
9930016920

**कल्याण**
डॉ. योगेश जोशी
9757077614

**कल्याण**
विकास वाचनालय (DSK)
9819931421

**बदलापूर**
नेत्रा नरवणे
9604677297

**अलिबाग**
श्रुती संतोष बोंद्रे
9423381129

**रत्नागिरी**
गार्गी केदार देवस्थळी
9404331020

**कणकवली-मालवण**
सुषमा केणी
9284035326

**वेंगुर्ला-सिंधुदुर्ग**
मधुरा नित्यानंद आठलेकर
9405925454

**उदगीर**
नितीन दुरुगकर
9579018581

**कराड**
संजय पुजारी (**डॉ.कल्पना चावला विज्ञान केंद्र**)
9226163260

**नांदेड**
शिवाजी आंबुलगेकर
9423440598

**लातूर**
ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र
9421693089

**लातूर**
वैद्य जयश्री कुलकर्णी
9326190749

**बुलढाणा**
मैत्री नरेंद्र लांजेवार
7666407475

**कोल्हापूर**
डॉ. धनश्री खाडे
9604636893

**अकोला**
उत्कर्ष जैन
9850263103

**SWS फायनान्शिअल सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड**

**नाशिक**
रुपाली कुलकर्णी
9011896681

**मुंबई**
किशोर काळे
9869239940

ऑनलाइन इंग्रजी बोलायला शिकण्याची
THE KINGS' English Academy
'वयम्'च्या वाचकांसाठी सुवर्णसंधी. केवळ 2000/- रुपये भरा आणि एक महिना ऑनलाइन क्लास आणि दोन वर्षांसाठी 'वयम्'चे सभासदत्व मिळवा. **विद्यार्थी, शिक्षक, महिलांसाठी स्वतंत्र बॅच.**
**संपर्क- प्रा. श्रुती राजे**
8421113111
9822240106

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

अहम् आवाम्
# वयम्
आपला सारे

न्यू वंदना को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, ३रा मजला,
लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
'वयम्' मोबाइल : ९१३७१२८९१५
इ-मेल : info@wayam.in
वेबसाइट : www.wayam.in



## सभासद नोंदणी फॉर्म

**१ वर्ष**
**₹ ११००/-**
कुरियर चार्जेससहित

**१० + १ दिवाळी अंक**

scan here to pay

नोंदणी क्रमांक : .................... दिनांक : ....................

नाव : ....................

पत्ता : ....................

.................... पिन कोड : ....................

जवळची खूण : ....................

फोन : .................... इमेल : ....................

जन्मतारीख : .................... इयत्ता : ....................

शाळा : ....................

वर्गणी जमा केल्याचा तपशील

चेक नं. : .................... बँक व बँक शाखा : ....................

चेक दिनांक : .................... रुपये : ....................

'वयम्'च्या ऑनलाइन सबस्क्रिप्शनसाठी माहिती-

Labindia Analytical Instruments Pvt. Ltd. Axis Bank, Thane | CC A/C No.: 911030017556004 | IFSC : UTIB0000061

चेक / डिमांड ड्राफ्ट : लॅबइंडिया ॲनॅलिटीकल इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि.
(Labindia Analytical Instruments Pvt. Ltd.) या नावाने काढावा. सही : ....................

*'वयम्' मासिकाचे वर्गणीदार झाल्याबद्दल धन्यवाद!*

RNI NO.MAHMUL/2013/53138 POSTAL Reg. No.THC/85/2020-22 Post at Mumbai Patrika Channel Sorting Office G.P.O. Mumbai 400 001
Published on 1st of every month and posted on 5th of every month

50 Years Of Banking Excellence

टीजेएस्बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
1972-2022
Bharose ka Bank Bhavishya ka Bank

# विद्यार्थी बचत खाते

किशोर वयातील पाऊल टीजेएस्बीत ठेवून
होऊया उद्याचे यशस्वी तरुण



## टीजेएस्बी विद्यार्थी बचत खाते

- 10 ते 18 वयोगटातील मुलांसाठी एटीएम् डेबिट कार्ड
- चेकबुक सुविधा*
- कमाल आहरण मर्यादा ₹ 5000/- प्रति दिन

*नियम आणि अटी लागू.

www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 223 466 / 1800 266 3466